सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. १८ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७६ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पालिका शाळांनी विद्यार्थ्यांना परकीय भाषा देखील शिकवाव्यात : राज्यपाल

मुंबई, १७ जून – लहान मुले तंत्रज्ञान स्नेही असतात तसेच ते नवनवीन भाषा देखील लवकर शिकतात. बृहन्मुंबई महानगर पालिका देशातील श्रीमंत महानगर पालिका असून पालिकेने आपल्या शाळा संपूर्ण देशासाठी पथदर्शक म्हणून विकसित कराव्या तसेच विद्यार्थ्यांना जर्मन, जपानी, यांसारख्या विदेशी भाषा देखील शिकवाव्यात, अशी सूचना राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केली.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कुल शाळेचा नव्या शैक्षणिक सत्राचा विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव स्वागत समारंभ राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या वरळी मुंबई येथील शैक्षणिक परिसरात मंगळवारी (दि. १७) संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

मुंबई महानगरपालिका ११०० शाळा चालवीत असून ३.५० लाख विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्य व भोजन मोफत देत असल्याबद्दल पालिकेचे अभिनंदन करताना शाळांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाशिवाय कौशल्य विकास व खेळासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्या असे राज्यपालांनी सांगितले. मुंबईत खेळांची मैदाने कमी असल्यामुळे शाळांना रोटेशन पद्धतीने मैदाने उपलब्ध करून द्यावीत असे राज्यपालांनी सांगितले. फिनलँड देशाच्या शिक्षण पद्धतीचे कौतुक केले जाते असे नमूद करून पालिकेने आपल्या काही शिक्षकांना तेथील शिक्षण पद्धती समजून घेण्यासाठी पाठवावे असे राज्यपालांनी सांगितले. गरिबीतुन लोकांना बाहेत काढण्यासाठी शिक्षण ही एकच किल्ली असल्याचे नमूद करून पालिकेतील विद्यार्थ्यांचा दहावीचा निकाल ९३ टक्के लागल्याबद्दल राज्यपालांनी सर्वांचे अभिनंदन केले. शाळेत पोषण आहार देताना ज्या विद्यार्थ्यांना अंडी खाणे चालत असेल अश्या विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी देण्याबाबत देखील पालिकेने प्रायोगिक तत्वावर सुरुवात करावी अशी सूचना राज्यपालांनी केली.

यावेळी राज्यपालांनी निवडक विद्यार्थी व पालकांना शैक्षणिक साहित्य व चॉकोलेट्सचे वाटप केले. राज्यपालांनी वर्गखोल्यांची पाहणी केली तसेच खगोलशास्त्र प्रयोगशाळेला भेट दिली. पालिकेच्या शाळेतून ९७ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनीचा राज्यपालांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी अतिरिक्त महानगर पालिका आयुक्त डॉ अमित सैनी यांनी मुंबई महानगर पालिका कन्नड, तामिळ, मराठी, हिंदी, उर्दू आदी आठ माध्यमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देत असून राज्य परीक्षा मंडळासह, सीबीएसई, आयसीएसई, आयबी आदी मंडळांचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देत असल्याचे सांगितले. मुंबई महानगर पालिकेचे शैक्षणिक बजेट ४००० कोटी रुपयांचे असून पालिका विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक साहित्य मोफत देत असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, महानगरपालिका उपआयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ, शिक्षक, पालक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतीला आता एआय ची जोड! आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्यांना मिळणार दुप्पट मानधन

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज १० महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्यातील सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे महा-ग्री-एआय धोरण २०२५-२०२९ ला मिळालेली मान्यता.

यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. या धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान, ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि डेटा विश्लेषण यांचा वापर करून राज्यातील कृषी क्षेत्रात मोठं तांत्रिक परिवर्तन घडवता येणार आहे.

यामुळे महा-डिबीटी, महावेद, ग्रीस्टॅक, डिजिटल शेतीशाळा, गमार्केनेट, क्रॉपसॅप यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प आणखी सक्षम होतील.

आणीबाणीतील लढवय्यांना सन्मान – मानधन दुप्पट

१९७५ च्या आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेले नागरिक आजही लोकशाहीचे खरे रक्षक मानले जातात. अशा लोकांच्या मानधनात आता दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेऊन सरकारने त्यांचा सन्मान केला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या पुढील टप्प्याला वेग

देशातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीपैकी असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला नवसंजीवनी देण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णयही याच बैठकीत घेण्यात आले.

परदेशात स्थायिक भारतीयांच्या मुलांसाठी शिक्षण निर्णय

अनिवासी भारतीय (छठख) नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी नव्या धोरणात्मक सवलती आणि योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे त्यांना राज्यातील शैक्षणिक संधी अधिक उपलब्ध होतील.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील १० मोठे निर्णय

ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग)

एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. (महसूल विभाग)

मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग)

## भारतीयांनी तेहरान सोडून सुरक्षित ठिकाणी जावे, भारतीय दूतावासाचे आवाहन

### भारतीय दूतावासाने केले आपल्या नागरिकांना आवाहन

नवी दिल्ली : इराणच्या तेहरान शहरावर होणाऱ्या हवाई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर इराणमधील भारतीयांनी तत्काळ दुसऱ्या एखाद्या सुरक्षित शहरात स्थलांतरित व्हावे असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. तसेच तेहरानमधून बाहेर पडण्यासाठी योग्य व्यवस्था होईपर्यंत त्यांनी भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहण्यास सांगितले आहे.

इराणमधील भारतीय दूतावासाने म्हटले आहे की, सर्व भारतीय नागरिकांना तेहरान शहराबाहेर सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. इराणमधील भारतीय दूतावासाने तेहरानमध्ये असलेल्या आणि दूतावासाच्या संपर्कात नसलेल्या सर्व भारतीय नागरिकांना तात्काळ दूतावासाशी संपर्क साधून त्यांचे स्थान आणि संपर्क क्रमांक देण्याची विनंती केली आहे. संपर्क क्रमांक +९८९०१०१४४५५७, +९८९१२८१०९११५ आणि +९८९१२८१०९१०९ असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.इराण आणि इस्रायलमधील वाढत्या लष्करी तणावादरम्यान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने इराणमधून भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे परत आणण्याची प्रक्रिया सुरू केली होती. सध्या तीन विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय विद्यार्थी आहेत, ज्यात १५०० काश्मिरी आहेत.

## शालेय निधी व्यवहारात गैरप्रकार आढळ्यास कारवाई होणार : उदय सामंत

रत्नागिरी : राज्यात अनेक ठिकाणी शालेय शिक्षण विभागाचा आढावा पालकमंत्री उदय सामंत यांनी घेतला. शिक्षण क्षेत्रातील काही अधिकाऱ्यांना उदय सामंतानी चांगलंच धारेवर धरलं. जिल्हातील ५ हजार ८३० शिक्षकांपैकी किती शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रम राबवले आहेत ? पंतप्रधान अंतर्गत निधीतून काय काम केली ? विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी कोणते उपक्रम राबवले आहेत ? यांसारखे अनेक प्रश्न विचारुन उदय सामंत यांनी शिक्षकांची चांगली शाळा घेतली.

तसेच उदय सामंत यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला, रत्नागिरी येथील वाडा याठिकाणी शिक्षकांने विश्रांतीगृह सुरु केले आहे. कोणत्याही विद्यार्थ्याला झोप आली. तर वडिलांप्रमाणे विद्यार्थ्याला झोपवलं जातं विद्यार्थी झोपेतून जागा झाल्यानंतर पुन्हा शिकवलं जातं. सामाजिक कार्य म्हणून ३६५ दिवस विद्यार्थ्यांना शिकवण्याचं काम शिक्षक करत असतात. तसेच काही शिक्षक विद्यार्थ्यांना बागेत खेळता यावं यासाठी बाग तयार करतात.काही शाळेतील विद्यार्थी इंग्रजी आणि मराठी एकाच वेळी लिहितात. अशा शिक्षकांचं मार्गदर्शन ठेवायला हव, अशी सुचना उदय सामंत यांनी केली...

तसेच उदय सामंत यांनी पंतप्रधान योजने अंतर्गत खर्च करण्यात आलेल्या शाळांना अहवाल देखील मागवला. यामध्ये काही गैरप्रकार आढळला तर त्यांच्यावरती फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

शालेय पोषणा संदर्भात अँप तयार करण्यात यावे. विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यात यावी. ज्या शाळेत पटसंख्या वाढवलेली आहे. त्या शाळेची माहिती गावागावत जाऊन सांगावी. अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.

## बीड : संतोष देशमुख हत्याप्रकरणाची सुनवणी पुढे ढकलली?

बीड : बीड जिल्हातील संतोष देशमुख हत्याप्रकरणतील सुनावणी पुढे ढकलण्यात आली. मकोका न्यायालयातील न्यायधीश सुट्टीवर असल्याने सुनावणी २४ जून रोजी होणार आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणातील सुनावणी १७ जून रोजी होणार होती. वाल्मिक कराडच्या आरोपांवरती नेमका काय युक्तिवाद होणार आहे. याकडे संपूर्ण बीड रहिवाशांचं लक्ष लागून होते. न्यायालयाचे न्यायाधीशांच्या अनुपस्थितीमुळे युक्तिवाद पुढे ढकलण्यात आला आहे. बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता.

## आता सर्व एटीएममधून मिळतील १०० आणि २०० रुपयांच्या नोटा!

मुंबई : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बँकांना त्यांच्या एटीएममधून १०० आणि २०० च्या लहान नोटा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले होते. आता बँकांनी या दिशेने चांगली प्रगती केली आहे. आरबीआयने घेतलेल्या एका निर्णयाचा परिणाम आता बाजारात दिसत आहे. देशातील ७३ टक्के एटीएममधून १०० आणि २०० रुपयांच्या नोटांना भरण्यास सुरुवात केली आहे. एका अहवालानुसार, देशातील ७३% एटीएम आता अशा आहेत की किमान एका कॅसेटमधून १०० किंवा २०० च्या नोटा वितरित केल्या जात आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये ही संख्या ६५% होती, याचा अर्थ आता सतत सुधारणा होत आहे. सामान्य लोकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारांसाठी सहज लहान नोटा मिळाव्यात, जेणेकरून त्यांना गरजेच्या वेळी दुकानांमध्ये किंवा बँकांमध्ये नोटा बदलण्याची समस्या भेडसावू नये, हा ठइखचा उद्देश आहे. विशेषतः ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे खूप उपयुक्त ठरेल.

सीएमएस इन्फो सिस्टम्सचे रोख प्रबंधक अध्यक्ष अनुश राघवन यांनी सांगितले की, नोटांची उपलब्धता सुधारत आहे. ग्राहकांच्या खर्चाचे ६० टक्के प्रमाण आताही रोखीनेच होत आहे. अशा गावखेड्यात खासकरुन १०० आणि २०० रुपयांच्या नोटांची उपलब्धता दिवसेंदिवस देवाण-घेवाण संबंधीच्या गरजा थेट पूर्ण करीत आहे.

## कर्नाटक हायकोर्टाची आरसीबी, केएससीएला नोटीस

### चिन्नास्वामी स्टेडियममधील चेंगराचेंगरीचे प्रकरण

बंगळुरू, १७ जून : बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालयाने आरसीबी, डीएनए कंपनी आणि कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशनला (केएससीए) यांना नोटीस बजावली आहे.

बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर ४ जून २०२५ रोजी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी)च्या आयपीएल विजयाच्या उत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेने संपूर्ण क्रिकेट विश्व हादरले. या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५६ हून अधिक जण जखमी झाले होते. या प्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालयाने स्वतःहून (सु-मोटो) जनहित याचिका दाखल करत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी), इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए एंटरटेनमेंट नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) यांना नोटीस बजावली आहे. याचिकेची पुढील सुनावणी २३ जून रोजी निश्चित करण्यात आली आहे. या दुर्घटनेची चौकशी करुन राज्य सरकारने या प्रकरणाबाबत न्यायालयाला अहवाल सादर केला आहे.

आरसीबीच्या ऐतिहासिक आयपीएल विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी ४ जून रोजी हजारो चाहत्यांनी स्टेडियमबाहेर गर्दी केली होती. गर्दी नियंत्रणात आणण्यात यंत्रणांना अपयश आल्याने अचानक चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेमुळे कर्नाटकातील प्रशासन, पोलिस आणि आयोजक संस्थांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## १३ वर्षांच्या मुलाची गळा चिरून हत्या

जळगाव: जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील खर्ची गावात एका १३ वर्षीय मुलाची गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मृत मुलाचा मृतदेह शेजारील गावच्या शेतात फेकून देण्यात आला होता, ही घटना नरबळीसाठी तर घडवून आणली गेली नाही ना, असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. तेजस महाजन (वय १३) असं मृत मुलाचं नाव असून तो रिंगणगाव येथे राहणारा, तो काल म्हणजेच दिनांक १६ जूनपासून बेपत्ता झाला होता.

## क्वांटम संगणन उपक्रमाच्या माध्यमातून प्राध्यापकांना प्रशिक्षण : चंद्रकांत पाटील

मुंबई, १७ जून – राज्यातील उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी आणि प्राध्यापकांच्या क्षमतेत गुणात्मकवाढ करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने 'क्वांटम संगणन उपक्रम' राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील ५०० हून अधिक प्राध्यापकांना क्वांटम तंत्रज्ञानासंदर्भातील विशेष प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

आज मंत्रालयात मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, उपसचिव संतोष खोरगडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे, 'मित्र' संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, क्वांटम तंत्रज्ञान कक्षाचे प्रमुख डॉ. जे. बी. व्ही. रेड्डी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), आय-हब क्वांटम तंत्रज्ञान फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कुंज टंडन, प्रकल्प संचालक आणि पुणे येथील भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे प्राध्यापक प्रा.सुनील नायर, मित्राच्या शिक्षण सेलचे वरिष्ठ सल्लागार पूजा मिसाळ तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसह विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने दर्जात्मक उच्च शिक्षणाची तयारी सुरू आहे. या उपक्रमातून केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे तर नवयुगातील अध्यापन कौशल्ये ही विकसित केली जातील. प्राध्यापक प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत अधिक दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण पोहोचवले जाईल. राज्यातील विविध विद्यापीठांतील व तांत्रिक महाविद्यालयांतील ५०० पेक्षा अधिक प्राध्यापकांना प्रशिक्षण आणि क्वांटम संगणन, संशोधन, नावीन्यपूर्णता व कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे .

आय-हब क्वांटम तंत्रज्ञान फाउंडेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम महाराष्ट्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा असून, तो तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्राला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असेही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

## यशाचा नवा मंत्र : शिवतंत्र - समाजाला दिशा देणारे पुस्तक

### खासदार छत्रपती उदयनराजे यांच्या हस्ते साताऱ्यात प्रकाशित

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १७ में – सातारा शहरातील ऐतिहासिक जलमंदिर येथे दि १७ में रोजी शिवशाहीर डॉ. विजय तनपुरे लिखित यशाचा नवा मंत्र : शिवतंत्र या प्रेरणादायी आणि सामाजिक परिवर्तन घडवणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन खासदार छत्रपती श्री. उदयनराजे भोसले महाराज यांच्या शुभहस्ते अत्यंत दिमाखात आणि उत्साहात पार पडले.या प्रसंगी शहरातील साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. हा केवळ एक प्रकाशन सोहळा नव्हता, तर नव्या युगाला दिशा देणारा सामाजिक संदेश देणारा एक ऐतिहासिक क्षण होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वयं लेखक डॉ. विजय तनपुरे होते. हे पुस्तक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असून, त्यातील १३ यशमूल्यांवर 'शिवतंत्र' ही विचारसरणी उभी करण्यात आली आहे. या विचारांचे



मूळ उद्दिष्ट म्हणजे – कोणत्याही परिस्थितीतून बाहेर पडून, स्वबळावर यशस्वी होण्याचा मार्ग समाजाला दाखवणे.

या प्रसंगी बोलताना खासदार छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले, हे पुस्तक केवळ वाचण्यासाठी नसून नव्या पिढीला यशस्वी होण्यासाठी दिशा देणारे आहे. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून व्यवस्थापन, दूरदृष्टी, आत्मभान आणि निर्णयक्षमता शिकवली आहे. हे पुस्तक वाचून कोणताही युवक स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतो. समाजात अशी सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी पुस्तके चळवळ बनली पाहिजेत.

शिवशाहीर डॉ. विजय तनपुरे हे एक अपंग व्यक्तिमत्व असूनही त्यांनी आपल्या ३७ वर्षांच्या कारकिर्दीत देश-विदेशात पोवाड्यांच्या माध्यमातून शिवचरित्र पसरवले आहे. २००१ मध्ये झालेल्या मोठ्या वैयक्तिक नुकसानानंतर त्यांनी स्वतःला उभं करून पुन्हा आयुष्य घडवले. गेली २६ महिने त्यांनी सतत वर्कआउट करून स्वतःचं आरोग्य सुधारणे, समाजसेवा करणे आणि शिवतंत्र या विचाराच्या माध्यमातून तरुणांना उद्योजक बनवण्याचे कार्य सुरू केले आहे.शिवतंत्र' संकल्पनेवर आधारित सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली. शिवाश्रम या अपंगांसाठी उभारलेल्या त्यांच्या सेवाभावी केंद्राची माहितीही उपस्थितांना देण्यात आली.

हे पुस्तक माझ्या आयुष्याचा अनुभव आहे. शिवाजी महाराजांच्या विचारांनी मी स्वतःला पुन्हा घडवलं. तेच विचार मी आता समाजात पोहोचवत आहे. हे पुस्तक प्रत्येक शाळा, महाविद्यालय, तरुण उद्योजक, बेरोजगार युवक, अपंग बांधव आणि सर्वसामान्य कुटुंबातील लोकांसाठी नवा प्रकाश देईल,असे लेखक डॉ. तनपुरे यांनी सांगितले.प्रकाशन सोहळ्याचे निवडक क्षणचित्रे, शिवकालीन सादरीकरण आणि उपस्थित मान्यवरांचे अभिप्राय यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी झाले.या पुस्तकाच्या माध्यमातून फक्त वैयक्तिक यश मिळवण्याचा मार्ग नाही, तर समाजाचा पुनरुज्जीवन घडवण्याचा एक व्यापक विचार मांडण्यात आला आहे. 'शिवतंत्र' ही संकल्पना शिवाजी महाराजांच्या विचारांची आधुनिक काळातील पुनर्मांडणी असून, ती नव्या भारतासाठी एक प्रभावी दिशा देऊ शकते.

## पैठण शेतकरी खरेदीविक्री संघाची निवडणूक बिनविरोध; निष्ठावंतांना न्याय

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- खासदार संदीपान भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार विलास बाप्पू भुमरे पुरस्कृत पॅनलच्या विरोधात उमेदवाराच नसल्याने पैठण शेतकरी खरेदीविक्री संघाची निवडणूक बिनविरोध पार पाडली असून बिनविरोध निवडून आलेल्या सर्व १७ संचालकांचा खासदार संदीपान भुमरे यांच्याहस्ते नाथ मंदिर समोरील डोम याठिकाणी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे,राज्य दूध महासंघाचे संचालक नंदलाल काळे,रेणुकादेवी सहकारी साखर कारखाण्याचे व्हाईस चेअरमन नंदलाल पठाडे, जिल्हा संघटक पुष्पा गव्हाणे, शहर संघटक ज्योती काकडे,शहादेव लोहारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी या निवडणुकीत निष्ठावंतांना न्याय दिल्याचे यावेळी चेअरमन बाबुराव पडुळे म्हणाले.

नूतन संचाकल गणपत माने,बळीराम औटे,दीपक मोरे, देविदास पठाडे,महेश बोंबले,हरिश्चंद्र तांबे, अमोल गिरगे,सुरेश लिपाने, अनिल हजारे,लक्ष्मी नलावडे, सोपान थोरे,लताबाई तांबे, कालिंदा थोरात,दीपक भडके, बंडू महाराज गाढे, विजय सुट्टे आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला. पैठण तालुका शेतकरी खरेदी विक्री संघासाठी निवडणूक प्रक्रिया प्रमाणे दिनांक १८ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख असून दिनांक १७ रोजीच आमदार भुमरे पुरस्कृत पॅनल समोरील उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली.या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी बलराम नवथर,योगेश भुकिले, तुषार खिस्ती यांनी काम पाहिले.

लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनपा आयुक्तांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन आयुक्त श्रीमती मानसी यांनी शाळेच्या पहिल्याच दिवशी मनपाच्या मंठाळे नगर येथील शाळा क्रमांक ९ येथे भेट दिली. पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी स्वागत केले.

शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी राज्य शासनाच्या निर्देशानुसार मनपाच्या वतीने सर्व शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मनपाच्या शाळेतही रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.शाळेला तोरणे लावून सजावट करण्यात आली होती. लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आलेल्या होत्या. मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी मंठाळे नगर येथील मनपा शाळेत विद्यार्थ्यांच्या भेटी घेतल्या. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फुगे, बिस्किट व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटपही त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आयुक्त श्रीमती मानसी म्हणाल्या की, शाळा म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण घेणे नव्हे. शाळा हे संस्कार करण्याचे ठिकाण आहे. शासनाच्या वतीने मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही बाबीची कमतरता भासू देणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मी शाळेत जात आहे,मी शाळेत आलो आहे, अशा सेल्फी पॉईंटचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी नवीन प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या पहिल्या पावलांचे ठसेही शाळेच्या वतीने घेण्यात आले. यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, श्वेता नागणे, मधुकर ढमाले, शिवदास शिंदे यांच्यासह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## संक्षिप्त वृत्त...

### महाविद्यालयाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात पहिल्या दिवशी उत्साहात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, स्टाफ सचिव प्रा.विवेक कदम यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावर्षी बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे बीए प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेण्यासाठी पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला तर अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान वर्गासाठी शासनाच्या नियमानुसार नोंदणी केलेले विद्यार्थी प्रवेश यादीच्या प्रतीक्षेत असल्याचे जाणवले. बारावीचे वर्ग मात्र नियमित सुरु झाले. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारात गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. हरिहर गायके, प्रा. संदीपान चौगुले, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा.सोपान डोपे, प्रा.महारुद्र बिडवे, प्रा.संतोष कल्याणकर यांची उपस्थिती होती.

### ‘रस प्यायला ये’ म्हणणारे दोघे अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** रस्त्याने चालत निघालेल्या विवाहितेला ‘रस प्यायला ये म्हटलं’, असे म्हणणाऱ्या एका अल्पवयीन तरुणासह अन्य दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यातील एका अल्पवयीन मुलाला समज देऊन सोडून देण्यात आले आहे. तर अन्य दोघांना अटक करण्यात आली. तर आरोपींनाही डोक्याला मार लागला आहे. त्यांच्या फिर्यादीवरून एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर शहराच्या गरूड चौक ते महादेव नगर दरम्यान, रविवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याच भागातील काही तरुणांनी एका मुलीसोबत गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी पीडितेने आरडाओरड केली. त्यावेळी तिचा भाऊ धावून आला. त्यावेळी छेडछाड करणाऱ्या आरोपी अजय सकट, दुर्गेश सकट व एका अल्पवयीनाने त्याच्या डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केले. हे भांडण सोडविण्यास पीडितेची आई आली असता आईलाही शिवीगाळ करण्यात आली. त्याचवेळी जखमी झालेल्या भावाच्या मित्राचे मित्र तेथे जमा झाले, त्यांनीही आरोपी सकट यांना दगडाने मारहाण केली होती.

### समसापूर शाळेची प्रवेश दिंडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** तालुक्यातील समसापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने सोमवारी पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांची गावातून प्रवेश दिंडी कढण्यात आली.

इयत्ता पहिलीच्या वर्गात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीनेही स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी सरपंच महादेव बरिदे, ग्रामसेवक येलाले, शिक्षण विस्तार अधिकारी संजय देशपांडे, अधिकारीमधुकर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब गरड, पपेश दत्त यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेतील विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शालेय पाठ्यपुस्तक व गणवेशाचे ही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक व्ही. आर. साळुंखे, मंगेश सुवर्णकार, शत्रुघ्न बिरादार, ज्ञानोबा डुकरे, सुधीर मादळे, शिवनंद पडलवार, सुरेखा चंदेले, अक्षय अकनगीरे यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### कमला नेहरु शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** येथील कमला नेहरू विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी नूतन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तकासह गुलाब पुष्प व गोड खाऊ देऊन संस्थेचे सचिव शिवानंद हेंगणे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांशी हेंगणे यांनी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले व तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार हा मंत्र दिला. तसेच एक विद्यार्थी एक झाड माँ के नाम वृक्ष लागवड केली. यावेळी मुख्याध्यापिका दर्शना एकघरे, उमाकांत पाचंगे, पांडुरंग कुंभार, प्रतिभा सांगवीकर, सुरेंद्र चोबळे, पांडुरंग नरवटे, प्रदीप गायकवाड, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, संजय बने, पंडित नागरगोजे आदींची उपस्थिती होती.

## शाळेची घंटा वाजली; विद्यार्थ्यांचे पुष्प देवून स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** उन्हाळी सुट्ट्या संपल्याने नवीन शैक्षणिक वर्ष १६ जून २०२५ पासून सुरू झाले. सोमवारी शाळांची घंटा वाजल्याने जवळपास चाळीस दिवसांपासून शांत असलेल्या शाळांत किलबिलाट ऐकायला मिळाला. शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिलीसह इतर वर्गातील विद्यार्थ्यांना पुष्प, खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषद व अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शूज, पायमोजे देण्यात आले असून, पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शाळेत हजर राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले.



गेल्या आठवडाभरापासून शाळा स्वच्छतेसह वर्ग खोल्यांची डागडुजी करण्यात आली. तसेच शाळांच्या मुख्याध्यापकांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने २३ प्रश्नांची प्रश्नावली देऊन शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले होते. बहुतांश जिल्हा परिषदेसह व्यवस्थापनांच्या शाळांनी सोमवारी (दि.१६) शाळा सुरू करण्याची जोरदार तयारी केली होती. जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिलेचे जास्तीत जास्त प्रवेश करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

शाळेत पहिले पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश, बूट आणि सॉक्स वितरित करण्यात आले असून, त्यांचे पहिले पाऊल अविस्मरणीय ठरावे यासाठी पायांचे ठसे घेण्याचा विशेष उपक्रम राबविण्यात आला.

### सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते गणवेश वाटप

अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील नवागत विद्यार्थ्यांचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्प देवून स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तक व बूट वितरीत करण्यात आले. तसेच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

ज्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतले, त्याच शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी उपस्थित राहताना आनंद होत आहे. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, सुविधा पुरविण्यासाठी शासन प्रयत्न करीत असल्याचे सहकारमंत्री पाटील यांनी सांगितले. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, गटविकास अधिकारी संतोष माने, सरपंच मच्छिंद्र वाघमारे, उपसरपंच सूरज पाटील, गटशिक्षणाधिकारी बबन ढोकाडे यांच्यासह पदाधिकारी, पालक उपस्थित होते.

## केशवराज विद्यालयात नवागतांचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** येथील श्री केशवराज विद्यालयात सोमवारी शाळेच्या पहिल्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते नवागतांचे गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, श्री केशवराज माध्यमिक विद्यालय शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक केंद्रे यांनी, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे वेगळेपण सांगून विद्यार्थ्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी संस्था नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विद्यालयातून ज्ञानाची, संस्काराची शिदोरी घेऊन आपले जीवन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात गंगाधर खेडकर म्हणाले, शाळेचा पहिला दिवस कायमस्वरूपी लक्षात राहणारा असतो. या दिवशी



अनेक नवनवे अनुभव मिळतात. श्री केशवराज विद्यालय हे ज्ञान व संस्काराचे केंद्र आहे. येथे शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपला समाज व देश घडवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अभ्यासक्रम नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक स्वागत अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांनी केले. प्रज्ञा नाईक यांनी सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले. तेजस्विनी सांजेकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

यशस्वीतेसाठी विद्यासभेचे संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक बबन गायकवाड, राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## एमएचटी-सीईटी- परीक्षेत शाहू महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** एमएचटी-सीईटी परीक्षा १७ एप्रिल, २०२४ ते २२ एप्रिल, २०२५ या दरम्यान सीबीटी पद्धतीने अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या एमएचटी-सीईटी-२०२५ परीक्षेचा निकाल सोमवार दि. १६ जून, २०२५ रोजी जाहीर झाला. त्यामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन केले आहे.

यावर्षी अभियांत्रिकी गटातून रोनक निरंजन अग्रवाल हा विद्यार्थी ९९.९४७५५ पर्सेंटाइल गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला आहे. सुशांत सुधाकर होळकर हा विद्यार्थीनी ९९.९४५०८ पर्सेंटाईल गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय तर शिवहोम प्रतापसिंह शिंदे हा विद्यार्थी ९९.९४४७५ पर्सेंटाईल गुण मिळवून महाविद्यालयात सर्वतृतीय क्रमांकावर आहे. साक्षी शिवराम ढेंबरे ही विद्यार्थीनी अनुसूचित जाती संवर्गातून ९९.६६५०५ तर ओमसाई रमेश बस्टेवाड यानेही चांगले गुण घेतले.

## शेतकऱ्यांच्या मुलींसाठी लातूर बाजार समितीतर्फे वसतिगृह सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, त्यांना राहण्यासाठी जिल्हा पातळीवर सुविधा उपलब्ध करून द्यावी यासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमुख, माजी आमदार धीरज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर बाजार समितीने नवीन गूळ मार्केट परिसरात अत्याधुनिक इमारत बांधून ‘राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब मुलींचे वसतिगृह’ सुरू करण्यात आले आहे.

शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलींना वसतिगृह उपलब्ध करून देणारी राज्यातील लातूर बाजार समिती पहिली आहे, अशी माहिती सभापती जगदीश बावणे यांनी



दिली आहे.

सुसज्ज व्यवस्था व अभ्यासिका असलेल्या या वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या मुलींना अल्प दरात राहण्याची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक मुलीसाठी टेबल, कपाट, खुर्ची तसेच शुध्द पाणी तसेच वसतिगृहात १०० टक्के महिला कर्मचारी सेवा देणार आहेत. वसतिगृह परिसरात सुरक्षा व स्वच्छता आणि हवेशीर वातावरण असलेले हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने लातूर तालुक्यातील शेतकरी आणि शेतमजूर यांच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची अल्प दरात राहण्याची सोय होणार आहे.

लातूर तालुक्यातील इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या शेतकरी व शेतमजूर असलेल्या पालकांनी न्यू गूळ मार्केट, रिंग रोड, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब मुलींचे वसतिगृह, लातूर येथे प्रवेश घेण्यासाठी लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती, छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, लातूर येथील कार्यालयात संपर्क साधून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, सचिव अरविंद पाटील यांच्यासह संचालकांनी केले आहे.



## विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सवाला लोकप्रतिनिधी व प्रभारी जिल्हाधिकारी यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** अंकुलगा (राणी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रवेशोत्सव कार्यक्रमाला खासदार डॉ. शिवाजी काळगे यांची उपस्थिती होती. यावेळी नवागतांचे पुष्प देवून स्वागत करण्यात आले. तसेच पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, गटशिक्षणाधिकारी अनिल पागे यावेळी उपस्थित होते. प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सजवलेल्या बैलगाडीतून ढोल ताशाच्या गजरात मिरवणूकीने शाळेत आगमन झाले. यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले.

मुरुडमधील पारूनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आमदार विक्रम काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा झाला. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. सकाळी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. यामध्ये शाळेत नव्याने प्रवेशित मुलासह सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. नव्याने प्रवेशित मुलांचे स्वागत करून यावेळी त्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले.

लामजना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव पार पडला.

## मांजरी येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लातूर तालुक्यातील मांजरी येथील यशवंत चौकातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित प्रवेशोत्सव कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी उपस्थिती दर्शवली.



यावेळी लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक पाटील, सरपंच महादेव ढगे, उपसरपंच भीमा धुमाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बल्लाळनाथ काळे, मुख्याध्यापिका चंदा देशमुख, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती पुरी, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मीना यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच त्यांना शालेय पाठ्यपुस्तके, गणवेश आणि शूजचे वाटप करण्यात आले. विद्यार्थी सजवलेल्या बैलगाडीत बसून शाळेत दाखल झाले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजावेत, यासाठी शाळा परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

मांजरी येथील यशवंत चौकातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या शाळेचा लौकिक कायम ठेवण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी सातत्याने प्रयत्न करावेत. मराठीसह इंग्रजीचे शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मीना यांनी केले. गटविकास अधिकारी श्री. भालके यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा !

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, मळवटी येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशोत्सव १६ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा झाला.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मुख्याध्यापक युवराज शिंदे सरांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. याप्रसंगी इयत्ता ५ वी ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात शाळेत पहिले पाऊल टाकले. यावेळी मुख्याध्यापक युवराज शिंदे , जाकरअली सय्यद, श्रीकृष्ण पवार, श्रीमती वैभवी पवार, विलास गिरी, श्रीमती मंजूषा शिंदे आदी उपस्थित होते.

## ‘राजमाता जिजामाता’चे २६ विद्यार्थी इंजिनिअरिंग प्रवेशास पात्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ जून -** एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात आला आहे. या परीक्षेत येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून २६ विद्यार्थी इंजिनिअरिंग प्रवेशास पात्र ठरले आहेत.

आशिष आनंदराव बिरादार हा ९८.५० पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयात प्रथम, निशा शिवाजी मोरे ९६.७५ पर्सेंटाईल द्वितीय, तर ईशान शैलेश अष्टेकर ९५.६० पर्सेंटाईल मिळवून तृतीय आला आहे. तसेच ईश्वरी शरद पांढरे हिने ९३.१६ पर्सेंटाईल, आदित्य संतोष गडदे ९२, प्रथमेश रवि कुलकर्णी ९०, यश प्रकाश गायकवाड ८८, प्रतिमा बद्रीनारायण चांडक ८८, दिपाली संजय धुप्पे ८५, सौम्या सौदागर काटे ८४, अभिषेक किशोर कुलकर्णी ८३, हंसिका भालचंद्र कोयलकर ८२, समृध्दी बाबासाहेब पाटील ८२,



खुशी संतोष गांधी ८०, साक्षी विश्वनाथ जवळकर ८०, यशवर्धन विजयसिंग जाधव ८०, भाग्यश्री सत्यविजय क्षीरसागर ७८, अनिकेत विद्यासागर मेखले ७८, यश विशाल पारसवार ७३, अजय विठ्ठल माडे ७२, करण संतोष खुपसे ७१, समिक्षा दत्ता गरड ६८, श्रावण सुधीर गडदे ६६, जय प्रकाश चेवले ६३, रेणू महेंद्र यादव ६१ तर सोहम उमाकांत कंटे याने ६१ पर्सेंटाईल मिळविले आहेत.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते आदींनी कौतुक केले.

## ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये नविन शैक्षणिक वर्ष २०२५ उत्साहात साजरा

बिडकीन दि १७ में पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु माउंटेन प्री स्कुल मध्ये नविन शैक्षणिक वर्ष उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या पहिल्या दिवशी लहान



मुलांना स्पेन्सील देऊन ऑक्शन करुन फुलांचा वर्षाव करुन मुलांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेच्या प्रवेशद्वारा समोर रांगोळी काढून रंगबिरंगी फुगे लावण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांनी चिमुकल्यांचे स्वागत करुन त्यांना शुभेच्छा दिल्या यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी नॅशनल मराठी विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत



सोयगाव,दि.१७ जून – नवीन शैक्षणिक वर्ष १६ जून पासून सुरुवात झाली.त्यामुळे शाळेचा परिसर विदयार्थ्यांनी फुलून गेला होता.नवीन वर्ग,नवीन मित्र,नवीन शाळा आदी.उत्सुकतेने विद्यार्थी व पालक आंनदी दिसून येत होते. सोमवार रोजी पहिल्याच दिवशी विदयार्थ्यांचे शाळेच्या वतीने पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले.व सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके वितरित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अमजद पठाण,पोपटराव साखळे,भाऊसाहेब सिरसाठ,पंकजकुमार साखरे,निलेश बावस्कर,भगवान पाटील,ज्ञानेश्वर पांडव,नितीन पाटील,संतोष पिसे आदी शिक्षक वृंदासह रामेश्वर चौधरी,कदीर देशमुख, शेख जाकेर,इम्रान पठाण आदी शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

## एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर

पुणे – स्टार युनियन दाई–इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाईफ) ने पॉलिसीबझारसोबत भागीदारी करून एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर केला आहे. हा एक नवीन, उच्च–संभाव्यता संपन्न इक्विटी फंड असून तो त्यांच्या युलिप पेन्शन प्रॉडक्ट – एसयूडी लाइफ पेन्शन प्लस साठी डिझाइन करण्यात आला आहे. हा नाविन्यपूर्ण फंड ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी एक धोरणात्मक मार्ग देऊन सक्षम करण्यासाठी सज्ज आहे, ज्याचा उद्देश त्यांच्या निवृत्ती बचतीला लक्षणीयरीत्या बळकटी देणे आणि अधिक लवचिक आर्थिक भविष्य घडविण्यास मदत करणारे उत्कृष्ट परतावे देणे आहे. एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड, टॉप ३०० कंपन्यांमधून निवडलेल्या ५० उच्च–प्रदर्शन करणाऱ्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवर केंद्रित दृष्टिकोन करतो. हा फंड वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, भांडवली वस्तू आणि पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, तंत्रज्ञान, तेल, धातू व खाणकाम, ऑटोमोबाईल्स व त्यांच्या सहाय्यक वस्तू आणि बांधकाम व रिअल्टी यांसारख्या महत्त्वाच्या आणि जलद वाढणाऱ्या क्षेत्रांमध्ये रणनीतीनुसार विविधता आणतो. बाजारातील सतत बदलणाऱ्या संधींशी सुसंगत राहण्यासाठी, या फंडाचा पोर्टफोलिओ प्रत्येक तिमाहीत धोरणात्मक पद्धतीने नव्याने समायोजित केला जातो, जेणेकरून त्याची उपयुक्तता आणि कामगिरी कायम राहते.

## ३५ लाखांच्या शिष्यवृत्ती केल्या प्रदान

नवी दिल्ली – विवो इंडियाने त्यांच्या देशव्यापी शिष्यवृत्ती कार्यक्रम 'विवो इग्नाइट: टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्ह' च्या विजेत्यांची घोषणा केली. हा उपक्रम सीआयईटी–एनसीईआरटी, आयआयटीएम प्रवर्तक टेक्नॉलॉजी फाउंडेशन आणि णछ ग्लोबल कॉम्पॅक्ट नेटवर्क इंडिया यांच्या सहकार्याने चालवला जात आहे. १५ जून रोजी नवी दिल्लीतील अशोक हॉटेलमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, जिथे इयत्ता ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमात २५० हून अधिक पाहुण्यांनी हजेरी लावली होती, ज्यात सहभागी विद्यार्थी, विविध शाळांमधील मुले आणि त्यांचे कुटुंब यांचा समावेश होता. विवो इग्नाइट: अ टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्हच्या तिसऱ्या आवृत्तीला देशातील ६६०+ जिल्ह्यांमधील ९,०००+ शाळांमधून ३७,००० हून अधिक नोंदणी मिळाल्या – मागील आवृत्तीपेक्षा ही संख्या दुप्पट आहे. या उपक्रमांतर्गत, ५,६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'टेक फॉर गुड' साठी, म्हणजेच समाजाच्या कल्याणासाठी तंत्रज्ञान–आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प कल्पना पाठवल्या. तीन टप्प्यांच्या मूल्यांकन प्रक्रियेनंतर – ज्यामध्ये प्रादेशिक स्तरावरील शीर्ष २०० कल्पनांची निवड, तज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांच्या मदतीने नमुना विकसित करणे आणि नंतर राष्ट्रीय अंतिम फेरी यांचा समावेश होता – या कार्यक्रमाने भारतातील तरुण नवोन्मेषकांच्या सर्जनशीलता, शहाणपणा आणि सामाजिक जबाबदारीला सलाम केला.

## अधिकृत सर्व्हिस सेंटर म्हणून रत्नप्रभा मोटर्सची नियुक्ती

अहिल्यानगर : इसुझू मोटर्स लिमिटेड, जपान या कंपनीची उपकंपनी असलेल्या इसुझू मोटर्स इंडियाने आज अहिल्यानगर येथे नवीन अधिकृत सर्व्हिस सेंटर (एएससी) सुरू करत महाराष्ट्रातील आपले सर्व्हिस नेटवर्क आणखी बळकट केले आहे.निंबळक रोडवर सोयीस्कर ठिकाणी असलेले हे नवीन सर्व्हिस सेंटर अहिल्यानगर आणि आसपासच्या भागातील इसुझू वाहन मालकांची उच्च दर्जाच्या सेवेविषयी वाढती मागणी लक्षात घेऊन सुरू करण्यात आले आहे. ६०० चौ. मी. क्षेत्रफळात पसरलेल्या या सुविधेमध्ये अत्याधुनिक वर्कशॉप, डायग्नोस्टिक टूल्स आणि प्रशिक्षित तंत्रज्ञ उपलब्ध आहेत, जे वेगवान आणि प्रभावी सर्व्हिसची खात्री देतात.या उद्घाटनाबाबत बोलताना इसुझू मोटर्स इंडियाचे व्यवस्थापकीय उपपसंचालक श्री. तोरू किशिमोटो म्हणाले, देशभरातील आमच्या ग्राहकांशी अधिक संपर्क राखण्यासाठी आम्ही आमचे सर्व्हिस नेटवर्क सातत्याने विस्तारत आहोत. अहिल्यानगरमधील हे नवे सर्व्हिस सेंटर ग्राहकांचे समाधान वाढवण्याची आणि वाहन मालकीचा अनुभव अधिक सुलभ करण्याची आमची वचनबद्धता दर्शवते. रत्नप्रभा मोटर्ससोबतच्या भागीदारीतून आम्ही इसुझूच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध झालेल्या विश्वासार्हतेचा आणि दर्जाचा अनुभव ग्राहकांना नक्कीच देऊ, असा आम्हाला विश्वास आहे.

## कॉस्मॉलॉजिस्ट बलदेवकृष्ण शर्मा यांचे 'नॅचरल युनिव्हर्स एक्सपेंशन' हे पुस्तक प्रकाशित झाले

मुंबई – प्रसिद्ध कॉस्मॉलॉजिस्ट आणि नवोन्मेषक बलदेवकृष्ण शर्मा यांचे 'मुंबई: नॅचरल युनिव्हर्स एक्सपेंशन' हे पुस्तक गुरुवारी मुंबईत एका आकर्षक कार्यक्रमात प्रकाशित झाले. हे पुस्तक हबलचा नियम आणि महास्फोट सिद्धांत यासारख्या दीर्घकालीन सिद्धांतांना आव्हान देणारे वैश्विक विस्ताराचे एक क्रांतिकारी नवीन मॉडेल सादर करते.हे अग्रगण्य काम नैसर्गिक विश्व विस्तार कायदा सादर करते, एक नवीन वैज्ञानिक दृष्टिकोन ज्यामध्ये वेळेला एक गंभीर चल म्हणून समाविष्ट केले जाते, हा घटक लेखक असा युक्तिवाद करतात की हबलच्या नियमात अनुपस्थित आहे. श्री. शर्मा यांच्या मते, या दुर्लक्षामुळे विश्वाच्या विस्ताराच्या सध्याच्या समजुतीमध्ये मूलभूत त्रुटी निर्माण होतात.नॅचरल युनिव्हर्स एक्सपेंशन लॉ या अंतरांना दूर करते आणि एक नवीन स्थिरांक, न्यू स्थिरांक सादर करते, जो विश्वाच्या गतिशीलतेचे अधिक चांगले स्पष्टीकरण देतो, असे ते पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी म्हणाले.

# शुभांगी शिंदे हुंडाबळी प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्याची सजग अंबाजोगाईकरांची मागणी

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथील शुभांगी शिंदे हुंडाबळी प्रकरणातील राजकिय वरदहस्त असलेल्या फरार आरोपीस तात्काळ अटक करून सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी. जेणेकरून समाजात अन्य कोणीही हुंडा घेणे किंवा देणे या प्रकारास आळा बसेल या प्रकारच्या मागणीचे निवेदन सजग अंबाजोगाईकरांच्या वतीने उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांना दिले आहे.सदरील निवेदन देतांना सजग अंबाजोगाईकर म्हणून मनस्विनी महिला प्रकल्पाच्या अरुंधती लोहिया, इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ राजेश इंगोले रोटरी क्लबचे धनराज सोळंके, इनरव्हील क्लबच्या श्रीमती सुरेखा शिरसाट खंडाळे मॅडम, डॉ नरेंद्र काळे, साहीत्य परिषदेचे डॉ धाकडे, शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार , अनंत जगातकर, भीमाशंकर शिंदे, पीडिता शुभांगी शिंदे यांचा भाऊ प्रदीप



साळुंके यांच्यासह अंबाजोगाई तालुक्यातील जेष्ठ नागरिक संघाचे ऍड अनंत जगतकर, पद्माकर सेलमोहकर ,आशा हबीब, डॉ दिलीप खेडगिकर यांच्यासह शहरातील विविध शाळातील अनेक विद्यार्थिनी , शिक्षक तथा शिक्षिका,पत्रकार, डॉक्टर्स, प्राध्यापक यांच्यासह अनेक संवेदनशील अंबाजोगाईकर सहभागी झाले होते.

एकेकाळी पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या राज्यात सातत्याने अमानुष घटनांची नोंद होत आहे. मागील काही दिवसात महाराष्ट्रभर गाजत असलेल्या वैष्णवी हगवणे हीस हुंड्यासाठी छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे प्रकरण गाजत असतानाच अंबाजोगाई तालुक्यात हुंडाबळीची अशीच एक घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. धारूर येथील मोहखेड माहेर असलेली शुभांगी संतोष शिंदे या उच्चशिक्षित विवाहितेस हुंड्यासाठी छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याची घटना नुकतीच घडली आहे. शुभांगी चा विवाह गीत्ता गावच्या संतोष शिंदे यांच्याशी २०२२ मध्ये संपन्न झाला. त्यावेळी वर पक्षाकडनं केलेल्या मागणीनुसार हुंडा दिलेला असताना सतत पैशाची मागणी केली जात होती. माहेरून पैसे घेऊन ये असा दबाव तिच्यावर आणून तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता. शुभांगीचा मृत्यू हा संशयास्पद आहे. अशा आशयाची फिर्यादही तिच्या भावाने पोलिसांमध्ये केलेली आहे. हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६२ लागू होऊन देखील आजही सर्व जाती–धर्मामध्ये मोठ्या प्रमाणात हुंडा घेतला जातो आणि त्याचाच परिणाम महिला व मुलांच्या शोषणामध्ये होतांना दिसून येतो. बालविवाह, कौटुंबिक हिंसा आणि बाल लैंगिक अत्याचार या समस्यांना हुंडा ही सामाजिक कूप्रथा अनेकदृष्टीने कारणीभूत आहे. या कूप्रथेंचा वापर करून नवविवाहितांचा छळ करणाऱ्या व्यक्ती आणि कुटुंबाचा तीव्र निषेध करत असल्याचे आणि पीडितेच्या कुटुंबियांच्या पाठीशी समस्त जागृत समाज आहे हा विश्वास त्यांना मिळावा आणि यापुढील घटनांना चाप बसावा याकरिता हे आंदोलन असल्याचे आपल्या निवेदनाद्वारे सजग अंबाजोगाई करांनी सांगितले. यावेळी प्रा अरुंधती पाटील, डॉ राजेश इंगोले यांच्यासह अनेकांनी आपली मनोगत व्यक्त करत शुभांगी शिंदे तसेच वैष्णवी हगवणे यांना श्रद्धांजली अर्पण करत सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केली.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे क्यु आर कोड मार्फत मिळणार माहिती

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १७ – जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत महिती व तंत्रज्ञानाची सांगड घालून क्यूआर कोडच्या माध्यमातून एका क्लिकवर संपूर्ण लेण्यांची सविस्तर माहिती आज पासून येणाऱ्या देशी व विदेशी पर्यटकांना मिळणार आहे. या क्यूआर कोडचे मंगळवार रोजी भारतीय पुरातत्व विभागाच्या



वतीने उद्घाटन करण्यात आले. पर्यटकांनी सदर सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन पुरातत्व विभागाचे लेणी संवर्धन सहायक अधिकारी मनोज पवार यांनी यावेळी केले. हे क्युआर कोड अजिंठा लेणीतील भारतीय पुरातत्त्व विभागाच्या तिकीट काउंटर व लेणी क्र.१ समोर पर्यटकांसाठी उपलब्ध असणार आहे. क्यूआर कोड उद्घाटन प्रसंगी भारतीय पुरातत्व विभागाचे संवर्धन सहायक अधिकारी मनोज पवार,म.प.वि.मंडळाचे व्यवस्थापक राज पाटील, गाईड अब्दुल नासेर, सारंग देशमुख, मधुसूदन पाटील, पुरातत्व विभाग कर्मचारी कैलास आरक,जनार्दन लव्हाळे, समाधान सोन्ने, सुरक्षा रक्षक समाधान आगे, सुनिल मगरे,आबा मनगटे,सागर भगत हे उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय परिषदेत एमजीएमचे डॉ. श्रीनिवास मोतीयेळे सन्मानित

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे क्रीडा विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी नुकतीच व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी येथील टॉन ड्युक थांग युनिव्हर्सिटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्पोर्ट्स सायन्स या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला. या परिषदेला विविध देशांतील नामवंत क्रीडा शास्त्रज्ञ, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी सहभाग नोंदवला होता.

डॉ. मोतीयेळे यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड नालिसिस यांच्यातर्फे आयोजित योगावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेतही सहभाग नोंदवला. तसेच वर्ल्ड सोसायटी फॉर पीस स्पोर्ट्स यांच्यातर्फे हनोई, व्हिएतनाम येथे आयोजित 'वर्कशॉप ऑन स्पोर्ट्स फॉर पीस २०२५' मध्ये देखील ते



सहभागी झाले होते.

या कार्यशाळांमध्ये महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापक आणि संशोधक यांचा गौरव करण्यात आला. डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांना गेल्या अनेक वर्षांपासून क्रीडा शिक्षण व संशोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'इंटरनॅशनल एज्युकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड नालिसिस या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आला.

या परिषदांच्या यशस्वी आयोजनासाठी टॉन ड्युक थांग युनिव्हर्सिटीचे स्पोर्ट सायन्स विभागाचे असोसिएट प्राध्यापक प्रो. डॉ. त्रिनह ट्रग हिऊ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांच्या या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे तसेच डॉ. सदाशिव जव्हेरी, डॉ. शशिकांत सिंग, प्रा. रहीम खान, निलेश खरे आणि इतर सहकाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जीतो लेडीज विंग झायका तर्फे पाककृती प्रतियोगीता प्रतिसाद

छत्रपति सभाजीनगर प्रतिनीधी जीतो लेडीज विंग, सि एस एन छत्रपति सभाजीनगर आयोजित झायका – पाच का दम या बहुप्रतीक्षित कार्यक्रमात, १३ जून रोजी उत्साहात पार पडला. जैन पाककलेचा सुगंध आणि सर्जनशीलतेची चव अनुभवायला मिळाली

स्पर्धेत एकूण ९ सहभागी होत्या आणि ३७ प्रेक्षकांनी या चविष्ट कार्यक्रमाचा आनंद घेतला. सहभागींसमोर स्टार्टर, स्मूदी, भाताचे प्रकार, पनीरची भाजी आणि गोड – असे पाच जैन प्रकार बनवण्याचे आव्हान होते.

हा कार्यक्रम रचना पहाडे



यांनी प्रायोजित केला होता. व शेफ पूनम बिंद्रा व शेफ समय जी चूडीवाल यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धा खूपच अटीतटीची झाली होती आणि प्रत्येक श्रेणीतून उत्कृष्ट पदार्थ निवडणे परीक्षकांसाठी खूपच कठीण झाले होते.

भाग्यश्री कटारिया यांना झायका क्वीन चा पुरस्कार मिळाला, तर रंजना जैन यांना रनर–अप घोषित करण्यात आले.

इतर सर्व सहभागी – नेहा बागरेचा, वंदना काकरीया या, पलक गंगवाल सर्वोत्तम गोड पदार्थ), भारती पगारिया, नेहा संकलेचा व रीना संचेती – यांना त्यांच्या–त्यांच्या श्रेणीत पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अनीता रुनवाल व मंजुषा कासलीवाल यांनी केले संयोजक आणि सह–संयोजक म्हणून उत्तम रित्या पार पाडले मंगलाचरण प्राची पाटनी ने केले

अध्यक्षा प्रिया मुथा व मुख्य सचिव सोनल जैन यांनी आपले मार्गदर्शक शब्द सांगून सहभागींचा आत्मविश्वास वाढवला. उपाध्यक्षा प्रीति बाकलीवाल व कोषाध्यक्ष डॉ. प्रियांका संघवी यांनी देखील कार्यक्रमाच्या यशात मोलाचे योगदान दिलेकेवळ ६ महिन्यांत जीतो लेडीज विंग, सी एस एन औरंगाबादने २० प्रभावी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले – ही त्याच्या समर्पणाची, सातत्याची आणि सशक्त स्त्रीशक्तीची खरी ओळख आहे.प्रेसिडेंट प्रिया मुथा यांच्या घोषणेनुसार,उडान, सक्षम आणि स्वयम या उपक्रमांतर्गत लवकरच विविध नवीन प्रकल्प सुरू करण्यात आहे

## खरेदीखतानुसार फेरफार होणे बाबत जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे समस्त जनतेस व संबंधितास सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे शेख आलीम शेख मुसा, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २८/०४/२०१० रोजी खालील नमुद घर पूर्वीचे मालक शेख नुरजानबी शेख गणी, शेख खलील शेख गणी व शेख गुफरान शेख गणी यांच्याकडून रजिस्टर खरेदिखताने विकत घेतलेली आहे. तेव्हापासून सदर मिळकत माझे पक्षकार यांचे कब्जात व मालकी हक्कात आहे. सदर खरेदीखतानुसार माझे पक्षकार यांचे नाव ग्रामपंचायत गोंदेगांव सदरी घेण्यात आलेले आहे. परंतु माझे पक्षकार हे अशिक्षित असल्याने त्यांचे नावाचे नोंद पी. आर. कार्ड सदरी भूमी अभिलेख कार्यालयात करावयाचे राहून गेलेले आहे.

तरी सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत नमुद मिळकती संबंधी भूमी अभिलेख कार्यालय सोयगांव येथे माझे पक्षकार यांचे नावे खरेदीखताचे आधारे फेरफार घेण्यास कुणाचाही उजर अगर आक्षेप असल्यास किंवा कसल्याही प्रकारे मालकी व हितसंबंध पोहचत असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप लेखी स्वरुपात आमच्या कार्यालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचाही उजर न आल्यास सदरील मिळकत ही निर्विवाद आहे, असे समजून आमचे पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर, आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व तो आमच्या पक्षकारावर बंधकारक राहणार नाही.

मिळकतीचे वर्णन

मौजे गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील सिटी सर्वे नंबर ३२८/अ क्षेत्रफळ ११४ चौ. मीटर (दगड वीट माती पत्राचे घर बांधकाम) ग्रामपंचायत मिळकत नंबर ३५६ पूर्व–पश्चिम लांबी ६० फुट व दक्षिण–उत्तर रुंदी २३.५ फुट ज्याचा चतुःसीमा पूर्वेसः–रस्ता, पश्चिमेसः भारत नेरपगार यांचे घर, दक्षिणेसः भास्कर नेरपगार यांचे घर, उत्तरेसः संभाजी नेरपगार.

करिता हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध केले असे.

दिनांकः– १७/०६/२०२५.

**अॅड सप्निल र. सुरळकर**
**सोयगांव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) औरंगाबाद यांचे व्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क. १८७/२०२५

१/– केशरबाई दगडू जाधव, वय ७० वर्ष, धंदा घरकाम, रा. पळाशी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/– कृष्णा दगडू जाधव, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. पळाशी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारमप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नाना रमत जाधव यांचा दि. ०५.०३.१९८४ रोजी मौजे पळाशी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला आहे. तसेच मयत दगडू नाना जाधव यांचा दि. ०७.०९.१९९२ रोजी मौजे पळाशी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन या दोन्हीस त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे एकमेव वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत नाना रमन जाधव व दगडू नाना जाधव यांचे वारस अंसुन त्यांना शासकीय व निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्रची आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि १६/६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता ३०/७/२०२५

क. लिपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८४/२०२५.

अर्जदार : १. गंगाबाई संतोष चव्हाण, वय. ५५ वर्षे, धंदा. घरकाम, २. सचिन संतोष चव्हाण, वय. ४० वर्षे, धंदा. शेती, ३. प्रविण संतोष चव्हाण, वय. ३७ वर्षे, धंदा. शेती, सर्व रा. हनुमंतखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ४. कविता संतोष चव्हाण, वय. ४२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. वरखेडी बु., ता. पाचोरा, जि. जळगांव.

–विरुध्द–

गैरअर्जदार – कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत संतोष छगन चव्हाण हे दि. २७/०७/२०२२ रोजी मौजे. हनुमंतखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत संतोष छगन चव्हाण यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– २१/०७/२०२५.

आज दि. १६/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९२/२०२५.

अर्जदार : १. रविंद्र पंढरीनाथ परेराव, वय. ५६ वर्षे, धंदा. मजुरी, २. ज्ञानेश्वर अशोक परेराव, वय. ३० वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत पंढरी जयराम परेराव हे दि. २३/१०/२०१६ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत पंढरी जयराम परेराव यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– २३/०७/२०२५.

आज दि. १७/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. १७७/२०२५

अर्जदार : १. गायत्री भुषण खैरनार, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. पुष्कराज भुषण खैरनार, वय–०८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस. एस. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत भुषण राजेंद्र खैरनार हे दि. २६/११/२०२१ रोजी गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत भुषण राजेंद्र खैरनार यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २५/०७/२०२५.

आज दि. १६/०६/२०२५ रोजी सही व न्यायलयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ३९०/२०२५

अर्जदार :– १. प्रेमसिंग पि. शिवसींग महेर (राजपुत), २. भगवान पि. शिवसींग महेर राजपुत) ३. रामधन पि. शिवसींग महेर (राजपुत) ४. लक्ष्मण पि. शिवसींग महेर (राजपुत) ५. महादु पि. शिवसींग महेर (राजपुत) ६, राजकुवर भ्र. शिवसींग महेर (राजपुत), ७. रामकुवर भ्र. प्रताप ढाकरे (राजपुत), ८, शामलाल पि. राजाराम महेर (राजपुत). ९. मिराबाई भ्र. अंबरसिंग महेर (राजपुत), १०. विठठलसिंग पि. अंबरसिंग महेर (राजपुत), ११. कपुरचंद पि. अंबरसिंग महेर (राजपुत), १२. देवकाबाई भ्र. गणेश घुनावत, रा. अर्जदार क. १ ते ६ कोबापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर अर्जदार क. ७ रा. वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर, अर्जदार क. १२ रा. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी.आर.राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, मानसिंग पि. राजाराम महेर (राजपुत) हे दिनांक ०५/०८/२०१४ रोजी मयत झाले असुन ते अविवाहीत होते त्यांचे आई वडील हे फार पुर्वी मयत झालेले आहेत. मानसिंग यास तिन भाउ नामे शिवसींग, शामलाल व अंबरसिंग असे आहेत त्यापैकी शिवसिंग व अंबरसिंग हे सुध्दा मयत झाले असुन अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत शिवसिंग यांचे तर अर्जदार क. ९ ते १२ हे मयत अंबरसिंग यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार क. ८ शामलाल हे मयत मानसिंग यांचे सख्ये भाउ आहेत. अर्जदार क. १ ते १२ मयत मानसिंग पि. राजाराम महेर राजपुत यांचे कायदेशिर वारस असुन त्यांना शासकिय कामाकरीता मानसिंग याचे वारस असल्याबाबतचे हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशीप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## अग्रलेख...

# संकटांना आव्हान द्यावे, आमंत्रण नको!

भ्रष्टाचाराच्या किडीने पोखरलेल्या यंत्रणा, बेपर्वाईच्या वृत्तीने बिघडलेली पिढी, सेल्फीसारख्या संसर्गाची बाधा झालेली तरुणाई आणि जगण्याचे मोल न समजल्यामुळे बहकून गेलेली मानसिकता अशा अनेक कारणांचा विळखा पडलेल्या समाजजीवनाच्या प्रत्येक कोपऱ्यावर दबा धरून बसलेल्या संकटांचे काम सोपे होत चालले असून, जीवनाची अखेर मानल्या जाणाऱ्या मृत्यूचे सावट सर्वत्र सातत्याने पसरल्याने दाटलेल्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे समाजजीवन भयग्रस्त झालेले आहे. दिवसागणिक कानावर आदळणाऱ्या अप्रिय बातम्या आणि अधूनमधून डोळ्यादेखही घडणारे जीवघेणे प्रसंग हे या भयग्रस्ततेचे मुख्य कारण असून अशा स्थितीतही, शहाणपण नावाच्या किमान संस्कृतीचे भान येण्याची चिन्हे मात्र सामाजिकतेपासून काहीशी दूर जात चालल्याने, सुरक्षित जगण्याच्या हक्काच्या पायमल्लीची मोठी जबाबदारी स्वत:वरच येऊन पडल्याची जाणीवही संपुष्टात येत आहे. सुरक्षित जगणे हा प्रत्येक सजीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. नैसर्गिक संकट किंवा आपत्तीसारख्या अनपेक्षिताच्या आघाताने या हक्ककावर गदा आलीच, तर त्याला कोणाचाच इलाज नसतो. पण जेव्हा कळत नकळत, नाईलाजाने किंवा जाणीवपूर्वक देखील आपल्याच हातून आपल्या हक्काची पायमली होत असेल, तेव्हा साहजिकच, दबा धरून बसलेली संकटे डाव साधतात आणि सुरक्षित जगण्याचा हक्क हिरावला जातो. गेल्या काही महिन्यांपासून आसपास घडत असलेल्या असंख्य अप्रिय घटनांची सांगड घालावयाचा प्रयत्न केला, तर यांपैकी नैसर्गिक घटना किती, मानवनिर्मित किती किंवा केवळ बेपर्वाईच्या वृत्तीतून जन्माला आल्याने जीवघेण्या ठरलेल्या किती, याची वर्गवारी करणे काहीसे कठीणच होईल. पहलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी निष्पाप पर्यटकांची गोळ्या घालून क्रूर हत्या केली. ज्या निष्पापांचा यात बळी गेला, ते दुर्दैवी होते. मात्र, जगण्याचा आनंद शोधण्यासाठी सुरू असलेल्या लहानमोठ्या प्रयत्नांमागेही संकटे दबा धरून दडलेली असतात आणि या संकटांचे बोट धरून मृत्यू घाला घालतो, हेच तेव्हाही स्पष्ट झाले होते. त्यानंतर घडलेल्या सर्व घडामोडींचे आपण सारेजण साक्षीदार असल्याने, त्या काळात प्रत्येकाची मानसिकता कशी होती, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. आपल्या लष्करी दलांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास असूनही, अनिश्चिततेच्या सावटामुळे अनेकांच्या मनात असुरक्षिततेची भावनादेखील निर्माण झालेली होती. तशीच भावना कोविड महामारीच्या संकटाने सर्वत्र दाटलेली होती. एका बाजूला असुरक्षिततेच्या भावनेमुळे जगण्याचे मोल जाणण्याचे भान येत असताना आणि बिघडलेली जीवनशैलीची घडी पूर्ववत् करण्याच्या आणाभाकादेखील घेतल्या जात असताना महामारीचे संकट निवळू लागले आणि बिघडलेल्या जीवनशैलीचाच गाडा पूर्वपदावर आल्याने पुन्हा सर्वत्र बेपर्वाई आणि बेफिकीरीचाच उद्रेक दिसू लागला हे वास्तव नाकारता येणार नाही. कदाचित त्यामुळेच, गेल्या काही काळात, विशेषतः पहलगामच्या दुर्दैवी घटनेनंतर कोसळलेल्या असंख्य आपत्तींची मुळे शोधणे व त्यापासून काही ठोस बोध घेणे गरजेचे होऊ लागले आहे.

निष्काळजीपणा, अज्ञान किंवा तांत्रिक चुकांमुळेदेखील अपघात होऊन जीवितहानी होते आणि असे काही घडून गेल्यानंतरच्या तांत्रिक प्रक्रियेचा भाग म्हणून केल्या जाणाऱ्या चौकशांतूनही अपघाताची मुळे मानवी चुकांमध्ये दडल्याचेही उघड होते. विशेषत: ज्या ठिकाणी संकटे दबा धरून बसण्याची शक्यता अधिक असते, अशी ठिकाणे शोधणे व त्यापासून सावध राहणे फारसे काही अवघड नसते. पण अशा ठिकाणांनाच आव्हान देत जीव धोक्यात घालणे किंवा असे धोके जाणीवपूर्वक निर्माण करणे हे बेपर्वाईचेच एक अंग असते. सुरक्षा नियमांचे पालन करण्यात भ्याडपणा आहे, अशी नाहक समजूत असलेला व त्या समजुतीस झुगारण्यात शौर्य मानणारा वर्ग बहुधा अशा बेपर्वाईस बळी पडलेला दिसतो. अलिकडे, मोबाईलग्रस्तता नावाच्या एका विकाराने असंख्यांची शिकार केली आहे. विशेषत:, तरुण वर्गाच्या दृष्टीने मोबाईल हा तर बहुधा शरीराचा बाह्य अवयव असावा अशीच स्थिती दिसत असून, त्याचा वापर करून आभासी दुनियेत रमणाऱ्यांना वास्तविक विश्वाचा विसर पडून जीवघेण्या संकटांची शिकार होण्याची वेळ ओढवल्याची अगणित उदाहरणे आसपास दिसत असतानाही, या संकटापासून सावध राहण्याची मानसिकता मात्र रुजत नाही, हे अगाध आहे. स्वत:वर स्वत:च्या क्षमतेच्या जाणिवांहून अधिक विश्वास ठेवून धोक्यास आव्हान समजून सामोरे जाण्याची बेपर्वाई हेही अशा संकटांचे कारण ठरत आहे. त्याखेरीज, शारीरिक क्षमतेच्या पलीकडे जाऊन केलेल्या कामातून स्वत:च्या आरोग्य व स्वास्थ्यास संकटात टाकण्याची मानसिकता हेदेखील संकटांना कारणीभूत ठरताना दिसते.

ही बाब चिंताजनक आहेच, पण व्यक्ती-व्यक्तीमध्ये रुजत चाललेली ही मानसिकता फैलावत गेल्यास तो एक सामाजिक विकार होऊन संकटे सामूहिक शिकारीसाठी सरसावतात हे अशाच काही घटनांमुळे स्पष्ट होत असल्याने ती चिंता अधिक गंभीर आहे. प्रत्येक आठवड्याच्या अखेरीस, शनिवारी-रविवारी येणारा सप्ताहान्त ही नैमित्तिक बाब आहे. दर आठवड्याअखेरीस तो येणारच हे सर्वांस माहीतही असले तरी प्रत्येक सप्ताहान्त ही पहिल्यांदाच पाहावयास मिळालेली पर्वणी आहे अशा भावनेने त्यामध्ये सारा उत्साह ओतण्याची प्रथा अलिकडे बेफामपणे रुजत चालली आहे. शनिवारी सप्ताहान्त साजरा करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या झुंडींनाही पर्यटक म्हटले जाते. असे हे पर्यटक, आसपासच्या किंवा दूरच्या कोणत्याही पर्यटनस्थळी प्रचंड गर्दी करतात आणि तेथील धोकादायक ठिकाणांना आव्हान देण्याचा आततायीपणाही करतात, असेच अनेक दुर्दैवी दुर्घटनांतून स्पष्ट झाले आहे. रविवारी पुण्याजवळ कुंडमळा नावाच्या एका फारशा परिचित नसलेल्या पर्यटनस्थळी मोजक्या गर्दीने तेथील एका कमकुवत लोखंडी पुलावर अक्षरशः आक्रमण केले आणि त्या पुलाची गर्दी झेलण्याची क्षमता संपताच तो कोसळला. संकटातून सावरण्यासाठी क्षणाचीही उसंत न देता, दबा धरून बसलेल्या मृत्यूने काही पर्यटकांना विळखा घातलाच आणि जगण्याचा आनंद शोधण्यासाठी घराबाहेर पडलेल्या गर्दीच्या उत्साहावर विरजणही पडले. वस्तुतः, हा पूल धोकादायक असून तेथे जाणे सुरक्षित नाही, अशी सूचना देणारा फलक त्या स्थळी होता असे सांगितले जाते. मात्र, उत्साहाच्या भरात त्याकडे दुर्लक्ष करून काही अतिउत्साहींनी त्या असुरक्षितेच्या सावटास आव्हान देण्याचे धाडस केले आणि आनंदाची अखेर शोकान्तिका झाली!

संकटाची जी अनेक अन्य कारणे असतात, त्यामध्ये बेपर्वाई, भ्रष्ट यंत्रणा आदींचाही हातभार असतो, असेही अनेकदा दिसून आले होते. काही वर्षांपूर्वी एका पावसाळ्यात कोकणातील चिपळूणजवळ एक संपूर्ण गाव एका फुटलेल्या बंधाऱ्याच्या लोंढ्यात नाहीसे झाले तेव्हा, खेकड्यांनी बंधारा पोखरल्याचे अजब कारण देत याच यंत्रणांनी संकटाचे खापर निसर्गावर फोडण्याचा प्रयत्न केला होता. गेल्या वर्षी मे महिन्यात मुंबईत घाटकोपर येथे एक अजस्र जाहिरात फलक अनपक्षितपणे कोसळला आणि सुरक्षिततेच्या भावनेने त्याच्या आश्रयास गेलेल्या १६ जिवांचा त्या संकटाने बळी घेतला. दैनंदिन जीवनात सुरक्षा व्यवस्थांची वारंवार तपासणी आणि विकासाच्या प्रक्रियेतून समोर येणाऱ्या आव्हानांचे भान राखण्याची गरज त्या वेळीदेखील अधोरेखित झाली होती. २०१६ मध्ये कोलकाता येथे उड्डाणपूल कोसळला, २०२२ मध्ये गुजरातेतील मोरबी पूल कोसळला, हे पाहता, सार्वजनिक पायाभूत सुविधा सुरक्षित राहतील याची खबरदारी घेण्याची व सुरक्षिततेच्या उपायांना प्राधान्य देण्याची कोणतीही गरज ही मानवी जीवनास आपण किती प्राधान्य देतो त्यावर बेतलेली असते. योग्य वेळी योग्य उपायांची आखणी, वैयक्तिक खबरदारी बाळगणे याचा अभाव बळावत चालल्याने, जेथे या साधनांचा अभाव असेल तेथेच आव्हाने देण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे, संकटे कोसळल्यानंतर त्याच्या जबाबदारीचे खापर फोडण्याआधी आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे झाले आहे. त्याचा अभाव वाढत आहे ही खरी काळजीची बाब आहे.

## आंतरराष्ट्रीय

# ड्रॅगनला सडेतोड उत्तर

प्रा. जयसिंग यादव

शेजारील देशांद्वारे चीन भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेश, मालदीव आणि पाकिस्तान ही याची ठळक उदाहरणे. भारतानेही चीनला आता त्याच्याच भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. फिलिपिन्सला ब्रह्मोस क्षेपणास्त्र दिल्यानंतर भारताने आता चीनच्या दुखऱ्या नसीवर बोट ठेवले आहे. भारतीय सैन्य चीनच्या मागच्या अंगणात लष्करी सराव करत आहे. मंगोलिया हा देश भारत आणि चीनमधील प्रभावासाठी एक नवी युद्धभूमी म्हणून उदयास येत आहे. चीनने रशियासह मंगोलियाशी त्रिपक्षीय करार करताच भारताने या मध्य आशियाई देशासोबत लष्करी सराव सुरू करून मंगोलियाशी वेगाने लष्करी संबंध निर्माण करण्यास सुरुवात केली. भारत आणि मंगोलियातील वार्षिक द्विपक्षीय लष्करी सराव अर्थात 'नोमॅडिक एलिफंट २०२५'ची सतरावी आवृत्ती ३१ मे रोजी सुरू झाली, तर याच्या एक दिवस आधी मंगोलियाने चीन आणि रशियासोबत सहकार्य करार केला. मंगोलियन सैन्याने भारतीय सैन्यासोबत संयुक्तपणे लष्करी कवायती सुरू करताच चीन संतापला. चीनने या 'राजनयिक स्वातंत्र्या'विरोधात मंगोलियाला इशारा दिला आहे. एका चिनी माध्यमाने धमकी दिली आहे की, भारतासोबतच्या या डावपेचांमुळे रशिया ते चीनपर्यंतच्या 'पॉवर ऑफ सायबेरिया २' पाईपलाईन प्रकल्पाबाबत संशयाचे सावट निर्माण झाले आहे. ही पाईपलाईन मंगोलियातून जाणार आहे. चीनला भीती आहे की मंगोलियाशी चांगले संबंध निर्माण करून भारत मंगोलियातून जाणाऱ्या या पाईपलाईनचा वापर चीनविरुद्ध करू शकेल. ही पाईपलाईन रशियाहून मंगोलियामार्गे चीनमध्ये ५० अब्ज घनमीटर गॅस वाहून नेणार आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे १०० अब्ज डॉलर्स आहे.

भारत-मंगोलियामधील संरक्षण सहकार्य ही काही नवी बाब नाही. 'नोमॅडिक एलिफंट'सारखे सराव वर्षानुवर्षे सुरू आहेत; परंतु सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीत त्याचे महत्त्व खूप वाढले आहे. हा लष्करी सराव मंगोलियाची राजधानी उलानबातर येथील विशेष दल प्रशिक्षण केंद्रात होत असून, त्यात दहशतवादविरोधी सराव, संयुक्त ऑपरेशन्स आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांच्या सिम्युलेशन क्रियाकलापांचा समावेश आहे. भारत मंगोलियाशी केवळ लष्करीच नाही, तर आर्थिक आणि धार्मिक संबंधदेखील मजबूत करत आहे. चीनमधील दुसऱ्या क्रमांकाचे सरकारी माध्यम असलेल्या 'चायना न्यूज सर्व्हिस'मध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखात १८४०-४२ च्या अफू युद्धात गमावलेले प्रदेश परत मिळवण्याच्या चीनच्या प्रतिज्ञेचा उल्लेख करण्यात आला होता. म्हणजेच चीनची नजर मंगोलियावरही आहे आणि भविष्यात तो ते ताब्यात घेऊ शकतो. लेखात म्हटले आहे की, मंगोलियाला चीन ऐतिहासिकदृष्ट्या आपला एक भाग मानतो. चीन २०४५ ते २०५० दरम्यान मंगोलिया ताब्यात घेण्यासाठी लष्करी हल्ला करू शकतो.



२०१६ मध्ये तिबेटी आध्यात्मिक नेते दलाई लामा यांनी मंगोलियाची राजधानी उलानबातरला भेट दिली, तेव्हा संतप्त चीनने मंगोलियाविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली. मंगोलिया हा एक भूपरिवेष्ठित देश आहे. याचा फायदा घेत चीनने मंगोलियासाठी एक अतिशय महत्त्वाचा मार्ग बंद केला. याशिवाय चीन आणि मंगोलियामधील वस्तूंच्या आयात-निर्यातीवर शुल्कदेखील लादले. मंगोलिया त्याच्या गंभीर आर्थिक समस्यांना तोंड देण्यासाठी चीनशी कर्जाच्या वाटाघाटी करत होता; परंतु चीनने कर्जावर चर्चा करण्यासाठी झालेल्या वाटाघाटीदेखील थांबवल्या. मंगोलियाला बीजिंगकडून ४.२ अब्ज डॉलर कर्ज मिळण्याची आशा होती. चीनला मंगोलिया आपल्या छत्राखाली राहावे असे वाटते; परंतु मंगोलिया आता राजनयिक स्वातंत्र्य शोधत आहे. त्यासाठी त्याला भारतासारख्या भागीदारांची गरज महत्त्वाची वाटते; परंतु मंगोलियाची सर्वांत मोठी समस्या म्हणजे चीनवरील त्याचे आत्यंतिक अवलंबित्व. आजही या देशाचे चीनवर सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त आर्थिक अवलंबित्व आहे तर ऊर्जा आणि पायाभूत सुविधांसाठी तो रशियावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याची परिस्थिती कठीण आहे. तिथे त्याला राजनयिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे; परंतु दोन महासत्तांच्या आर्थिक पकडीतून बाहेर पडणे कठीण आहे.

मंगोलिया चीन आणि रशियापासून तुटलेला राहू शकत नाही; परंतु भारतासोबतचे त्यांचे धोरणात्मक सहकार्य चीनसाठी चिंतेचा विषय बनल्याचा इशारा चीनने लेखात दिला आहे. भारताचे मंगोलियाशी मजबूत संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये मंगोलियाला भेट दिली होती. भारताने मंगोलियाला एक अब्ज डॉलर्सची कर्ज मदत दिली. मोदी यांनी मंगोलियाच्या संसदेत भाषण केले आणि असे करणारे ते पहिले परदेशी नेते बनले. त्यानंतर २०१९ मध्ये भारत आणि मंगोलियाने अंतराळ करारावर स्वाक्षरी केली. याशिवाय २००९ मध्ये भारत आणि मंगोलियामध्ये नागरी अणु करार झाला. भारत-मंगोलिया संयुक्त कार्यगट दरवर्षी बैठका घेतो. आता तर मंगोलिया भारत आणि चीन या दोघांसाठीही धोरणात्मक युद्धाचे केंद्र बनला आहे; परंतु फरक असा आहे की, भारत तेथे भागीदारी आणि आदराचे मॉडेल सादर करत आहे, तर चीन दबाव आणि भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. मंगोलियाला कोणाचे समर्थन करायचे हे ठरवायचे आहे; परंतु हे स्पष्ट झाले आहे की भारत आता हिमालयापुरता मर्यादित नाही, तर त्याने मंगोलियामध्येही धोरणात्मक उपस्थिती नोंदवली आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करत असते. तसेच भारतीय सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करते.

भारतीय लष्कराचे एक पथक अलिकडेच बहुराष्ट्रीय लष्करी सरावात सहभागी होण्यासाठी मंगोलियाला पोहोचले. भारतीय लष्कराच्या या तुकडीत ४० सैनिकांचा समावेश आहे. त्यात प्रामुख्याने कुमाऊँ रेजिमेंटच्या बटालियनचे सैनिक आहेत. खान क्वेस्ट नावाचा हा संयुक्त सराव आहे. मंगोलियाला पोहोचलेल्या भारतीय संघात महिला जवानांचाही समावेश आहे. हा सराव मंगोलियन सशस्त्र दल आणि 'यूएस इंडो-पॅसिफिक कमांड' यांच्या सहकार्याने आयोजित केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्याच्या मोहिमांसाठी सहभागी देशांच्या सैन्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना परस्पर समन्वय, ऑपरेशन्स आणि सहकार्यात चांगले बनवणे हे खान क्वेस्ट सरावाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हा सराव जागतिक शांतता राखणे आणि मानवतावादी मदतकार्यासाठी सैनिकांना तयार करतो. भारत दरवर्षी खान क्वेस्ट सरावात आपले सैन्य पाठवतो. भारतीय सैन्याच्या सहभागावरून दिसून येते की, भारत जागतिक शांतता राखणे आणि बहुपक्षीय लष्करी सहकार्याला महत्त्व देतो. या सरावामुळे भारतीय सैन्याला विविध देशांच्या सैन्यासोबत जवळून काम करण्याची आणि आंतरराष्ट्रीय लष्करी मानके स्वीकारण्याची संधी मिळते. २०२४ मध्ये भारतीय सैन्याच्या राजपुताना रायफल्स युनिटने या सरावात भाग घेतला होता. पहिल्यांदा २००३ मध्ये अमेरिका आणि मंगोलियन सशस्त्र दलांमधील द्विपक्षीय कार्यक्रम म्हणून हा सराव सुरू झाला. त्यानंतर, २००६ पासून हा सराव बहुराष्ट्रीय शांतता राखण्याच्या सरावात रूपांतरित झाला. यंदा त्याची बाविसावी आवृत्ती आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य त्यात भाग घेत असताना भारताने घेतलेला भाग चीनला खुपतो आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# स्थानिक निवडणुकांचे डिजिटल स्वरूप

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना काढण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिला आहे. ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणी संदर्भात न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर २०२२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. तसेच या संस्थांच्या प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासकीय अधिकारी सांभाळत आहेत. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया चार महिन्यांच्या आत पूर्ण करण्यास न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सांगितले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाल्याने आता सर्वच राजकीय पक्षांमध्ये कार्यकर्त्यांच्या कार्यशाळा, निवडणूकपूर्व बैठकी, नाराज पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश, निवडणुकांची लगबग पाहायला मिळत आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक प्रस्तावित असलेल्या महानगरपालिकांकडे तयारी संदर्भात माहिती मागवली आहे. ईव्हीएम, स्ट्राँग रूमच्या व्यवस्थेसंबंधी पत्राद्वारे विचारणा केली आहे, तर दुसरीकडे सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. राज्यातील नेतेमंडळी वेगवेगळ्या जिल्ह्यात जाऊन प्रचार करताना दिसून येत आहेत. माजी आमदारांच्या पक्षप्रवेशाच्या जाहीर सभांतून आरोप-प्रत्यारोप सुरू असल्यामुळे काही दिवसांत प्रचाराची रंगत वाढणार हे नक्की. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीला देशात व अनेक राज्यांत यश मिळाले. आता महानगरपालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीत मतदारांचा दृष्टिकोन स्थानिक समस्यांवर असतो. शहर व गावातील गल्ल्यांतून जाणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनपासून ते घराघरापर्यंत येणाऱ्या कचऱ्याच्या घंटागाडी, नाल्यांची साफसफाईची अपेक्षा मतदार मतदानाच्या आठवडाभरअगोदर बोलून दाखवितात. पक्षातील योग्य कार्यकर्त्यांची बुथनिहाय बांधणी केली, विश्वासार्ह चेहरा दिला आणि जागावार निवडून येणाऱ्या उमेदवरांची शाश्वती, योग्य रणनीती आखली, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सहज विजय मिळवता येतो. या पृष्ठभूमीवर संयमित रणनीती व जनतेच्या भावनांना हात घालणारे नेतृत्व दिले गेले, तर विरोधातील उमेदवार देखील येथे आपली छाप सोडू शकतात. जातिपातीत अडकून न राहता, विकासावर भर देणाऱ्या आणि स्थानिकांशी थेट संवाद साधणाऱ्या उमेदवारांना येथे चांगली संधी असते.

लोकशाहीमध्ये निवडणूक ही एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून आधुनिक काळात यात मोठे बदल झाले आहेत. पूर्वी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्यक्ष जनसंपर्क, जाहीर सभा, भिंतीवरचे पोस्टर, ऑटोरिक्षा, घोडागाडी आणि नेत्यांच्या प्रचार यात्रा या प्रमुख साधनांचा वापर केला जात असे. मात्र २१व्या शतकाच्या सुरुवातीला विशेषत: इंटरनेट, भ्रमणध्वनीच्या आधुनिक क्रांतीनंतर निवडणुकीचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले. प्रचाराच्या पारंपरिक साधनांच्या जोडीला डिजिटल साधनांची भर पडली. हा प्रचाराचा असा प्रकार आहे, ज्यामध्ये सोशल मीडिया, मोबाईल ॲप्स, व्हॉट्सॲप सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो. आजच्या काळात निवडणुकीत केवळ पोस्टर आणि भाषणं पुरेशी नसतात. लोक मतदार म्हणून विचारपूर्वक निर्णय घेतात. डिजिटल निवडणुकीचा जागतिक इतिहास पाहिला तर अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी २००८ मध्ये सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला होता. त्यांनी या माध्यमातून लोकांशी थेट संवाद साधत डिजिटल क्रांतीचा पहिला प्रभावी उपयोग केला. भारतात माध्यमांचे पहिले प्रभावी दर्शन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत घडले जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने 'अब की बार, मोदी सरकार' ही डिजिटल मोहीम जोरात चालवली. सोशल मीडियावर ट्रेंडिंग, विशेष मोबाईल ॲप्स, फेसबुक लाईव्ह आणि लाखोंच्या मेसेजिंगच्या माध्यमातून त्यांनी आपली प्रतिमा देशभर पोहोचवली. 'डिजिटल इंडिया'ची जाणीव त्यांनी निवडणुकीतूनच जनतेत रुजवली. त्या निवडणुकीत विविध पक्षांनी डिजिटल रणनीती वापरली. भाजपासह शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने देखील फेसबुक पेज, यूट्यूब चॅनेल, इन्स्टाग्राम प्रोफाईल्सचा वापर करून तरुणांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागातसुद्धा मोबाईल, इंटरनेटच्या वाढलेल्या वापरामुळे डिजिटल प्रचाराने महत्त्वाचे स्थान मिळवले. डिजिटल इलेक्शनचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे सिनेमा, कला किंवा सोशल मीडियावर प्रभाव असलेल्या लोकांमार्फत निवडणूक प्रचार करण्यात येतो. यामुळे त्यांचा प्रभाव त्यांच्या फॉलोअर्सवर होतो. आजची निवडणूक डिजिटल रणभूमीवर लढली जाते. मतदान मशीनवर होत असले तरी जनमत बनवण्यासाठी डिजिटल प्रचार जोरात सुरू आहे.

९८८१७१७८२८

## इतस्तत:


# माहिती-तंत्रज्ञानातील रोजगारांचे आव्हान

दत्तात्रेय आंबुलकर

२००० सालच्या प्रारंभी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान या विषयांच्याच जोडीला माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विषयातील पदवीधर उमेदवारांना चांगली, मनासारखी व आकर्षक पगाराची नोकरी सहज मिळत असे. त्यामुळे या क्षेत्रातील पदवी आणि पदवीधरांना करीअरपासून नोकरीपर्यंत प्राधान्य दिले जाई. मात्र, गेल्या पाच वर्षांत परिस्थिती बदलली आहे. या बदलांसाठी सकृद्दर्शनी जागतिक मंदी, कोरोनानंतरचे बदलते कामकाज आणि कार्यसंस्कृती, वाढत्या संगणकीकरणासह वाढलेली स्पर्धा, बदलती अर्थव्यवस्था व व्यावसायिक गणितं ही प्रमुख कारणे सांगितली जात असतानाच, त्यात भर पडली ती कृत्रिम बुद्धिमतेची. अल्पावधीत, पण मोठ्या प्रमाणात झालेल्या या बदलांचा अभ्यास धक्कादायक व अभ्यास करण्यासारखा ठरतो तो याचमुळे.

माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्र जेव्हा व्यवसाय-व्यवस्थापन क्षेत्रात विशेष प्रकाशझोतात होते, तेव्हा त्याची व या क्षेत्रातील रोजगारांची सर्वदूर व प्रतिष्ठेसह चर्चा होत असे. अगदी शैक्षणिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून करीअर-रोजगार व वैयक्तिक आयुष्यात स्थिरता येण्याच्या दृष्टीने माहिती-तंत्रज्ञान हे अव्वल क्षेत्र समजले जाई. असे होण्यामागची कारण परंपरा म्हणजे, ९० सालच्या दशकासोबत संगणक क्षेत्राला आलेली व्यावसायिक समृद्धी आणि त्याचदरम्यान झालेले जागतिकीकरण व जागतिक पातळीवरील खुली आर्थिक व व्यापार व्यवस्था. या बदलत्या स्थितीचा मोठा फायदा भारतीय संगणक उद्योग व या क्षेत्रातील शिक्षित-प्रशिक्षित उमेदवारांना स्वाभाविकपणे झाला. भारतातील उपलब्ध कौशल्य व संगणकीयतज्ज्ञ आणि उद्योगांची कर्तबगारी यामुळे अमेरिकेसह युरोप व प्रगतिशील देशांनी आपल्या वाढत्या संगणकीय गरजांच्या पूर्ततेसाठी भारताला प्राधान्य देण्यास सुरुवात केली व भारतीयांनी त्याचे चीज केले. याच्या परिणामी भारतातील संगणक क्षेत्रातील रोजगार संधी वाढत गेल्या.

नंतरच्या टप्प्यात व विशेषतः कोरोना काळात परिस्थितीने जागतिक स्तरावर वेगळे वळण घेतले. इतर उद्योग-व्यवसाय क्षेत्राप्रमाणेच संगणक क्षेत्रात कामकाज व व्यवसायापासून कर्मचाऱ्यांच्या संख्येपर्यंत मोठीच उलथापालथ झाली. याचाच पहिला व महत्त्वाचा परिणाम म्हणजे, संगणक व माहिती-तंत्रज्ञानाचा आर्थिक व व्यावसायिक प्रभाव कमी होऊ लागला. त्याचा थेट व प्रत्यक्ष परिणाम प्रचलित कर्मचाऱ्यांचा विकास आणि वेतनापासून नव्याने उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या जवळजवळ नगण्य स्वरूपात होण्यामध्ये झाला. हा बदल पाहणे व पचविणे अर्थातच जड गेले. एवढेच नव्हे, संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वच प्रस्थापित कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात कपात करण्यास सुरुवात केली. परिणामी, पूर्वी माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या एका प्रस्थापित कंपनीने एकाच दिवसात ५०० पर्यंत कर्मचाऱ्यांची कपात केली, तर नव्या कर्मचाऱ्यांच्या निवडीला अर्थातच थांबविण्यात आले. माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र क्षेत्रातील व्यवस्थापन-उद्योजक व कर्मचाऱ्यांनी हे संकट जेमतेम थोपवले. मात्र, व्यावसायिक परिस्थिती यथावत होत असतानाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व अंमलबजावणी सुरू झाली. याने विकसित संगणक तंत्रज्ञानापुढे मोठे आव्हान उभे केले. यामुळे अद्ययावत तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रातील अनेक प्रकारच्या कामांना बेकाम, तर ही कामे करणाऱ्यांना बेकार केले. हे परिणाम कंपन्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वच स्तरावर झाले. या परिणामांचे संख्यात्मक स्वरूप सांगायचे म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात २०१८ ते २०२१ या केवळ तीन वर्षांत नव्या कर्मचाऱ्यांची भरती ९५ हजारांनी कमी झाली. त्यानंतरही या संख्येत वाढ होत गेली व २०२३ साली हा आकडा दोन लाख ५० हजारांवर गेला. यालाच जोड मिळाली ती संगणक क्षेत्रातील कर्मचारी कपातीची.



परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती-तंत्रज्ञान उद्योगात आलेल्या व्यावसायिक व आर्थिक संकटांमुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील विशेषत: नवागत कर्मचाऱ्यांचे पगार व वेतनमान वाढणे तर दूर; पण ते जवळजवळ जैसे थे राहिले आहेत. ही बाब कर्मचारी व उमेदवारांसाठी निश्चितच काळजीची ठरली. कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील प्रस्थापित कंपनी असणाऱ्या टीमलीजने माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रातील मानव व्यवस्थापन क्षेत्रात प्रामुख्याने काम करणाऱ्या व्यवस्थापन कंपनीने त्यादरम्यान केलेल्या कर्मचारी सर्वेक्षणानुसार, त्यादरम्यान २०१५ साली माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या उमेदवार कर्मचाऱ्यांचे २०१५ साली असणारे तीन लाख ५० हजार असणारे वार्षिक सरासरी वेतन २०२४ साली सुमारे तीन लाख ८० हजार रुपये होते. ही बाब संबंधित कंपन्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांसाठीच मोठा काळजीचा विषय ठरला.

तसे पाहता, गेल्या सुमारे दोन वर्षांत कृत्रिम बुद्धिमता या नवीन आयामाची चर्चा सुरू झाली. या नवीन तंत्राचा वापर आणि त्याचे माहिती-तंत्रज्ञानासह विविध व्यावसायिक क्षेत्रांवर होणारे परिणाम याची व्यापक चर्चा अद्याप सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमता व त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रावर झालेल्या परिणामांमुळे संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यमान कर्मचाऱ्यांवर नोकरी-रोजगार गमावण्याचे व या क्षेत्रातील नवागतांपुढे नोकरी-रोजगार न मिळण्याचे संकट निर्माण झाल्याचे यानिमित्ताने प्रचलित होत आहे. कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर व त्याचे प्रचलित कर्मचाऱ्यांचे रोजगार व नव्या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराच्या संधी हे आव्हानात्मक मुद्दे महत्त्वाचे असले, तरी त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र व तेथील कर्मचारी यांनी निराशेतून आपण सर्वस्व गमावले वा गमवावे लागणार, अशी नकारात्मक भावना घेण्याचे मुळीच कारण नाही. याचे महत्त्वाचे व प्रमुख कारण म्हणजे, संगणकशास्त्र व माहिती-तंत्रज्ञान या व्यवसाय क्षेत्राला संपूर्ण व समर्थपणे पर्याय बनण्याची क्षमता कृत्रिम बुद्धिमत्ता विषयात उपलब्ध झाली नाही व तसे १०० टक्के होण्याची क्षमता पण नाही. माहिती-तंत्रज्ञानातील प्रकल्प व्यवस्थापनापासून विशेष तांत्रिक स्वरूपाचे काम, तांत्रिक मुद्यांची सोडवणूक यासारखी मोठी व महत्त्वाची कामे संगणकशास्त्र विषयाशी संबंधित राहणार आहेत. एवढेच नव्हे, तर माहिती-तंत्रज्ञान विषयातील काम करणाऱ्यांनी आपले संगणकीय ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव याचा परिणामकारक व यशस्वी वापर केल्यास एक नवे कार्यक्षेत्र त्यांच्यासाठी उपलब्ध होण्याची आशादायी शक्यता आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### कामगार संघटनांची सत्त्व परीक्षा

भारतातील काही प्रमुख कामगार संघटनांनी २० मे २०२५ ला राष्ट्रव्यापी संपाचा निर्णय घेतला होता. या संपाला भारतीय मजदूर संघाने विरोध केला. मागण्या अवास्तव होत्या म्हणून नव्हे तर संप करण्याची ती योग्य वेळ नव्हती. २२ एप्रिल २०२५ ला पाकिस्तान समर्थित अतिरेक्यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे धर्म विचारून २६ पर्यटकांची हत्या केली. त्यामुळे देशातील वातावरण तापले होते. भारत सरकारकडून पाकिस्तानवर प्रतिहल्ल्याची अपेक्षा केली जात होती. भारत सरकारने देखील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत अतिरेकी आणि त्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी हल्ला केला. भारतातील सर्व राजकीय पक्षांनी केंद्र सरकार ला जाहीर पाठिंबा दिला आणि एकजुटीचे अविस्मरणीय प्रदर्शन घडवले. त्यानंतर केंद्र सरकारने ७ शिष्टमंडळे जागतिक स्तरावर भारताची भूमिका विशद करण्यासाठी पाठविली. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षांनी केले. देशात कामगारांची संख्या फार मोठी आहे. भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धात आपलाही सहभात असावा असे कामगारांना वाटणे स्वाभाविक होते. त्यामुळे त्यांचा २० मेच्या संपाला विरोधच होता. भारतीय मजदूर संघ संपात नाही म्हटल्यानंतर तसेही संप विरोधी वातावरण देशात तयार झालेच होते. संपाचे आवाहन करणाऱ्या संघटनांनी प्रतिकूल परिस्थितीचा वेध घेत संप मागे घेतला. योग्य वेळी योग्य पाऊल उचलले त्यामुळे झाकली मूठ सव्वा लाखाची राहिली कारण संप करण्याची मानसिकता कामगारांची नव्हतीच.

या निमित्ताने कामगार संघटनांच्या भूमिकेविषयी भाष्य करणे सयुक्तिक ठरेल. कामगारांच्या प्रश्नांकडे राजकीय चष्म्यातून बघू नये. आपले राजकीय हेतू साध्य करण्यासाठी कामगार शक्तीचा उपयोग करून घेऊ नये. कामगारांचे हित जोपासणे हे कामगार संघटनेचे कर्तव्यच आहे. पण त्या आधी राष्ट्रहित आणि उद्योगहिताला प्राधान्य दिले पाहिजे. बदलत्या परिस्थितीत कामगार संघटनांचे धोरण बदलण्याची गरज आहे. युद्धजन्य परिस्थितीत देखील कामगार संघटना संपाची नोटीस देतात याची चीड समाजाला निश्चित आली असेल. कामगार संघटनांनी यावर विचार करण्याची गरज आहे. अन्यथा कामगार संघटनांचे अस्तित्व धोक्यात यायला वेळ लागणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## वाचक पत्रे

### चॅनल्सवाल्यांनी प्रेक्षकांची फसवणूक करू नये

सध्या विविध चॅनल्सवर मराठी मालिका मोठ्या संख्येने सुरू आहेत. या मालिका बघताना चॅनल्सवाले प्रेक्षकांना मूर्ख समजत असावे, असे वाटते. स्क्रिप्ट लिहिणारी व्यक्ती एकच असावी असे वाटावे अशी एखादी कल्पना आणि एकसारखेच विचार सर्व मालिकांमध्ये फिरत असतात. दिवाळी, होळी, संक्रांत यांचे चित्रण सगळीकडे चालू असते आणि सण संपल्यानंतरही कित्येक दिवस तेच तेच साजरे होताना बघायला मिळते. आताही वटपौर्णिमा सर्व मालिकांमध्ये सुरू आहे व सत्यवान सावित्रीची गोष्ट तर आता ती आजपर्यंत माहीत नसणार त्यांना पण अगदी पाठ झाली असणार. शिवाय सर्व मालिकांमध्ये नवरे वडाची पूजा करताना दिसत आहेत. सर्व पतिराज एकाच प्रेरणेने भारावलेले!

याच अनुषंगाने म्हणावेसे वाटते की, कुठल्याही गोष्टीचा अतिरेक करून टीव्ही रसिकांचा कंटाळा वाढत जाईल इतकंही ताणू नये. ज्येष्ठ नागरिकांसाठी टाईम पास म्हणून दूरदर्शन एक माध्यम असू शकते. पण असे प्रकार पाहून त्यांचा किती कंटाळा वाढवायचा? मालिकेची जास्तीत जास्त लांबी वाढेल म्हणून केलेले असले प्रयत्न असू नयेत. वर्षानुवर्षे त्या सुरू ठेवू नयेत. आपण दूरदर्शनवर असे कार्यक्रम बघणे म्हणजे आपला मूर्खपणा आहे असे सर्व प्रेक्षकांनी समजावे का?

**गौरी पटवर्धन**/नागपूर

●● ●●

### सुंदर आयुष्य जगावे

विवाहित अगर अविवाहित, बाल्य अथवा युवा, तरुण किंवा वृद्ध प्रत्येकाने परमेश्वराने दिलेल्या कर्मसिद्धांत व पूर्वजन्म सिद्धांतानुसार मनुष्य जन्म आनंदाने स्वीकारावा व त्याचे सोने करून सुंदर आयुष्य जगावे. आलेली संधी जीवनात चित्रपटाप्रमाणे रिटेक होत नाही आणि मग पश्चात्ताप होतो. जीवनात शिस्त हवी. निष्काळजीपणा, कंटाळा, व्यसने, राग, अरसिकता, श्रीमंतीचा उन्माद या गोष्टी दूर केल्या तरच जीवन सुंदर बनते. कलियुगात आपल्यातील नकारात्मक शक्ती सहजासहजी जात नाही. त्यामुळे भक्ती कितीही केली तरी श्रद्धा-सबुरीनेच पुढे जावे लागते. कारण पूर्वजन्मीच्या कर्मांचा अर्थात पापांचा निचरा सहजासहजी होत नाही. सगळ्या गोष्टी उपलब्ध झाल्या तरी विश्रांती, संवाद, समाधान आणि आनंदासाठी मानसिक थकवा दूर व्हावा लागतो. दुसऱ्याच्या कामात लुडबुड कमी केली तरीही उत्साह वाढतो. एक कायम लक्षात ठेवावे पाव्याच्या अंगावर काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडरिपु मीपणाच्या अहंकारापासून दूर आहेत म्हणूनच तो मंजुळ स्वर देतो आणि परमेश्वराच्या अधरावर लीन होऊन बोलतो. असे प्रत्येक जण जीवन जगेल तर भगवंताला तो नक्कीच प्रिय राहील; यासाठी सुंदर आयुष्य जगावे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# मोदी सरकारच्या कार्यकाळातील कामांची माहीती देणाऱ्या प्रदर्शनीचे उद्घाटन

## संकल्प से सिध्दी तक अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन

५



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्त मोदी सरकारच्या कार्यकाळातील महत्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी कामांची माहीती प्रदर्शनीच्या माध्यमातून दाखविण्यासाठी हिंगोली भारतीय जनता पक्षाच्यावतीने प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

येथील गांधी चौकात भारतीय जनता पक्षाच्यावतीने मोदी सरकारच्या ११ वर्षाच्या यशस्वी कार्यकाळातील विविध योजना, निर्णय आणि गरीब कल्याणकारी योजनांबद्दल माहीती देणारी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. या प्रदर्शनीचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर आणि जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी केले. यावेळी संकल्प से सिध्दी तक अभियानांतर्गत गोरगरीब जनतेसाठी आणि देशासाठी मोदी सरकारने केल्याचा कामांचा तसेच निर्णयांचा चित्राद्वारे तसेच माहीतीद्वारे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पंच प्रण शपथ असे या प्रदर्शनीचे नाव असून यावेळी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्राची उन्नती विकास आणि स्वत:चे व्यक्तिमत्व विकास या दृष्टीने मी शपथ घेतली.



विकसित भारताचा अमृत काळ आणि सेवा, सुशासन व गरीब कल्याणाची कामे याबद्दल सविस्तर माहीती प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आली असून सर्व सामान्य जनतेसाठी ही प्रदर्शनी खुली करण्यात आली आहे. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, अ‍ॅड अमोल जाधव, मिलींद यंबल, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, शशीकांत वडकुते, बाबा घुगे, मनोज शर्मा, आशिष जैस्वाल, सुनीताताई मुळे, क्रिष्णा रूहीटीया, ज्योती वाघमारे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, राजू यादव, उमेश गुठ्ठे, अ‍ॅड घुगे, शाम खंडेलवाल, नंदकिशोर खिल्लारे, पद्माकर नायक आदींची उपस्थिती होती. ही प्रदर्शनी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# खुडज येथे विना परवाना वाहतुक करणारे सागवान पकडले

## वन विभागाची कार्यवाही, ५० हजारांचे सागवान जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

हिंगोली ते रिसोड मार्गावर खुडज पाटीजवळ विना परवाना वाहतुक करणारे सागवानासह एक टेम्पो वनविभागाच्या पथकाने पकडले असून वनविभागाच्यावतीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील एका व्यक्तीने सेनगाव तालुक्यातील खूडज येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील सागवानाची झाडे खरेदी केली. मात्र झाडे तोडण्याची व वाहतुकीची परवानगी न घेता संबंधित व्यापाऱ्याने झाडे तोडून त्याची वाहतुक करण्यासाठी एका टेम्पो मध्ये सागवान भरले. या संदर्भातील माहीती मिळाल्यानंतर विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी सचिन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल जी पी मिसाळ, वनरक्षक विशाल मुदीराज यांच्या पथकाने रात्रीच्या सुमारास वाहनाची तपासणी सुरू केली. यावेळी खुडज पाटीजवळ टेम्पो क्र एमएच ४५ ०३८० हा थांबविण्यात आला. वन विभागाच्या पथकाने टेम्पो चालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. तर सागवान वाहतुकीसाठी परवानगी लागते याची माहीतीच नसल्याचे त्याने वन विभागाच्या पथकाला सांगितले.

यावरून पथकाने सदर टेम्पो व सागवान ताब्यात घेऊन सेनगाव वन विभागाच्या कार्यालयात आणला. याप्रकरणी पथकाने दोघांची चौकशी सुरू केली आहे. या टेम्पोमध्ये सुमारे ५० हजारांचे सागवान असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच खुडज येथील शेतकऱ्याचा जवाब नोंदविला जाणार असल्याचे वन विभागाच्या सुत्रांनी सांगितले.

# संत नामदेव महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

संत नामदेव महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथून संत नामदेव महाराजांच्या पालखीचे दि १७ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले असून सवड, त्यानंतर हिंगोली येथे पहिला रिंगण सोहळा होणार आहे.

संत नामदेव महाराज संस्थान येथे दि १६ जून रोजी तीन वाजता पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार गजाननराव घुगे, संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, द्वारकादास सारडा, भागवत सोळंके, शशीकांत गवते, ज्ञानेश्वर किर्तनकार आदींची प्रमुख उपस्थिती होती.



मंगळवार दि १७ जून रोजी सकाळी सात वाजता पालखी घोटा देवी, सवड, केसापूर मार्गे सायंकाळी हिंगोलीत दाखल होणार आहे. हिंगोली येथे महाराजा अग्रसेन चौकात पालखी सोहळ्याचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर ही पालखी शहरातील प्रमुख मार्गावरून रामलीला मैदान येथे दाखल झाली. याठिकाणी पालखीचे पहिले रिंगण सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी वारकरी, घोडे, हातात भगवे ध्वज घेऊन धावतांना दिसत होते. हा सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



**हिंगोली– कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डमध्ये सोमवारी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी वाहनाद्वारे हळद विक्रीसाठी आणली होती. परंतु शेडमध्ये आधीपासूनच व्यापाऱ्यांचा मालाच्या थप्प्या असल्यामुळे शेतकऱ्यांना वाहनातील हळद भिजू नये यासाठी ताडपत्री लावून पावसात थांबावे लागत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस अधीक्षकांचा फ्लिपकार्टकडून सत्कार



हिंगोली–फ्लिपकार्ट पार्सल कंटेनरवर दरोडा टाकणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा एलसीबी पथकाने अवघ्या ४८ तासांत छडा लावत आठ जणांना अटक केली असून, सुमारे २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल फ्लिपकार्ट हिंगोली हबचे इन्चार्ज राजू मगर, तसेच कर्मचारी विठ्ठल मस्के, विकीन दांडगे, महादेव नागरे आणि नानाराव घुगे यांनी हिंगोलीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. या वेळी अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे, एलसीबी टीमचे देखील विशेष आभार मानले.

### हिंगोली ते लिंबाळा बस सुरू करण्याची मागणी



हिंगोली– हिंगोली ते लिंबाळा या मार्गावर भिंगी, आंबाळा, आडगाव, बेलुरा, वडद, चिंचाळा या गावातील प्रवासी मोठ्या संख्येने प्रवास करतात. परंतु एसटी महामंडळाकडून एसटी नसल्यामुळे या गावांतील गोरगरीब व सर्वसामान्य लोकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे या गावाला दररोज ये–जा करणारी एस टी सोडण्यात यावी अशी मागणी आगार व्यवस्थापकाकडे निवदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी केली आहे.

### भाटेगाव येथील सरपंच आरक्षणासाठी उपोषण

हिंगोली– कळमनुरी तालुक्यातील भाटेगाव येथे ग्रामपंचायत स्थापनेपासून आजपर्यंत एकदाही अनुसूचीत जातीला सरपंच पदाचे आरक्षण मिळाले नाही. यासंदर्भात गावातील बौध्द, चांभार मातंग समाजाच्यावतीने दि २८ एप्रील रोजी आक्षेप नोंदविण्यात आला होता. परंतु या आक्षेपाची अजूनही दखल घेतली नाही. त्यानंतर दि २ जून रोजी जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात स्मरणपत्रही सादर करण्यात आले परंतु कोणतीही कार्यवाही न झाल्याने अनुसूचीत जाती समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

# वटकळी येथे दोन गटात तुंबळ हाणामारी, परस्परविरोधी तक्रारीवरून १९ जणांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

सेनगाव तालुक्यातील वटकळी येथे आंध आदिवासी आणि मुस्लीम समाजात तुंबळ हाणामारी झाली असून याप्रकरणी परस्पर विरोधी तक्रारीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात १९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून दि १७ रोजी पोलिसांनी आरोपींना सेनगाव न्यायालयात हजर केले होते.



पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील वटकळी रविवारी दि १५ जून रोजी रात्रीच्या सुमारास दोन गटात वादाला तोंड फुटले होते. फिर्यादी गणेश डाखोरे यांनी मन्सुर अली बाबु शेख यास तू कोंबड्याचे पंख, पाय, आतडे बिरसा मुंडाच्या पाटीजवळ का टाकत आहे अशी विचारणा केली असता आरोपी मन्सुर अली बाबु शेख, शब्बीर बाबु शेख, आतिफ बाहु शेख, शैलेश बाबु शेख, महेबुब बाबु शेख, सलीम बाबु शेख, टिलु बाबू शेख यांनी जातीवाचक शिवीगाळ करून गैरकायद्याची मंडळी जमवून गणेश डाखोरे चालुचा धाक दाखवित जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून आरोपीतांविरूध्द सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच प्रकरणात मन्सूर अली शेख यांच्या फिर्यादीवरून गणेश डाखोरे, भारत हनवते, गजानन अंभोरे, परसराम अंभोर, विष्णू डाखोरे, वामन डाखोरे, शुभम हनवते, विश्वनाथ डाखोरे, सोनु डाखोरे, नवनाथ अंभोरे, अमोल अंभोरे यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून मन्सूर अली यांच्या चिकनचे दुकान व पानपट्टी येथे ठेवू नको असे म्हणत खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण करून टिन पत्राचे दुकानाचे, घराचे, मोटारसायकचे नुकसान केल्याची तक्रारीत नमुद करण्यात आले आहे.

दरम्यान पोलिस उपाधिक्षक सुरेश दळवी, सेनगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिपक मस्के, उपनिरीक्षक सुभाष चव्हाण, जीवन मस्के यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. सध्या गावात शांतता असून पोलिसांनी गस्त सुरू केली आहे. दि १७ जून रोजी दोन्ही गटाच्या आरोपींना पोलिसांनी सेनगाव न्यायालयासमोर हजर केले असून त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

येथील भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेद्वारा संचलीत श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे.

शासनाने जिल्हा परिषद तसेच खाजगी अनुदानीत शाळेतील सेमी इंग्रजी व मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी शाळांना पुरवली आहेत.

यावेळी उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, डी पी डोईफोडे, बी बी शिंदे, अनिल लोळेवार, पंडीत शिरसाट, एन टी सोळंके, एस आर गुठ्ठे, एस पी गहेरवार, राजपूत, ग्रंथपाल रायाजी इंगोले यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सेमी इंग्रजी व मराठी माध्यमांच्या इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप करण्यात आली.

# एबीएम इंग्लीश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १७ जून**

शहरातील ए.बी.एम इंग्लिश हायस्कूल येथे आज दिनांक १७ जून रोजी राजमाता मांसाहेब जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक जोसेफ के जे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना राजमाता मांसाहेब जिजाऊ यांच्या बद्दल माहिती देण्यात आली. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमानिमित्त आपले मनोगतही व्यक्त केले. शाळेचे शिक्षक नितीन शिंदे यांनी राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे संस्कार हे आजच्या काळातही कसे टिकून आहेत व त्यांनी आपला संस्काराचा जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांना कसे घडवले यांची माहिती दिली. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदेश बोराळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रकाश वानखेडे यांनी केले.

# योग स्वास्थ्यासाठी योग्य उपाय– दिलीप चव्हाण

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १७ जून**

स्वास्थ्यासाठी अगदी स्वस्त उपाय म्हणून सर्वांनी योग केलाच पाहिजे निरोगी राहण्यासाठी हा एक स्वस्त उपाय असल्याचे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी केले.



स्व. लक्ष्मणराव पाटील सेवाभावी संस्था आणि पतंजली योग समितीच्या संयुक्त विद्यमाने तिरुपती नगर हिंगोली येथील ओमप्रकाश देवडा पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड हिंगोली मुख्य कार्यालय असलेल्या ओम भवन परिसरात जागतिक योग दिनानिमित्त पाच दिवसीय योग शिबिराचे उदघाटन करण्यात आले. यावेळी अ‍ॅड सतीशराव देशमुख, जालनापुरे, दिपकराव सवनेकर, माहोरे यांचे सह पतंजली योग समितीचे कुंडलिकराव निर्मले, विठ्ठल सोळंके, बालासाहेब हरण, अशोक पवार, शितल तापडिया, राजेश दार्वेकर, रमेश काळे, मंगल काळे, सुषमा होकर्णे, स्वाती वरखेडकर आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दीप प्रज्वलनाने योग शिबिरास प्रारंभ करण्यात आला. विठ्ठल सोळंके यांनी अष्टांग योग बाबत सविस्तर माहिती देऊन योगासने, प्राणायाम करून घेतला. जागतिक योग दिनाच्या अनुषंगाने देखील स्व.लक्ष्मणराव पाटील सेवाभावी संस्थेकडून पतंजली योग समिती हिंगोली यांच्या हस्ते बँकेच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

परतुरच्या तहसिलदारांची वाळु माफियांना नविन स्कीम!

# आमच्या तालुक्यातील नदीचा काठ भलताच महाग! तरीही का होतेय तहसीलदार गोरे यांची भागमभाग!!

## परतुर तालुक्यातील नागरीकांतील चर्चेने आले उधान!





परतुरच्या तहसीलदार प्रतिभा गोरे यांच्याशी या संदर्भात प्रतिक्रिया जाणुन घेण्यासाठी संपर्क केला असता त्यांनी फोन कॉल न घेता संपर्क टाळला.

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वैजोडा ते कोरेगाव शिवारातील दुधना नदी पात्रात तीन केन्यासह एक बोट बिनधास्तपणे वाळु उपसा करतांना दिसत असुन याकडे पाहण्यासाठी मात्र परतुर तहसील प्रशासनाचे अधिकारी आंधळे झाल्याने त्यांना कदाचीत हा अवैध वाळु उपसा दिसत नसल्याने याकडे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्व:जातीने लक्ष घालुन यावर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे. एकीकडे या अवैध वाळु उपस्याची सर्वत्र चर्चा असतांना नागरीकांतुन हेही बोलले जात आहे की, परतुरच्या तहसिल प्रशासनानेच वाळु माफियांसाठी नविन योजना आखली असुन हप्त्यापोटी रक्कम द्या अन् बिनधास्तपणे अवैध वाळु उपसा करा यामुळे तालुक्यातील नागरीकांच्या या चर्चेला आता उधान आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जिल्ह्यात अवैध वाळु उपसा करणाऱ्यांच्या नांग्या ठेचण्याचे काम जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून होत आहे, परंतु परतुर तहसिल प्रशासनाकडून याबाबत कुठलिही कारवाई होतांना दिसत नाही, उलट जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवून परतुर तालुक्याचे तहसिल प्रशासन अवैध वाळु उपसा करणाऱ्यांना पाठीशी घालुन (हप्त्यापोटी) माफियांना पाठबळ देण्याचे काम करत आहे, दुधना नदी पात्रात तीन केन्यासह एक बोटीद्वारे अवैधरित्या वाळु उपसा करतांना दिवसरात्र अनेकांच्या नजरेत येत आहे, फक्त प्रशासनातील अधिकारी ही माहिती असुन सुध्दा आंधळ्याचे सोंग करत आहेत, त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, यामागे नक्कीच आर्थिक कारण (हप्ता) तर नाही ना, त्यामुळे याप्रकरणामध्ये जिल्हाधिकारी यांनी स्व:जातीने लक्ष घालुन या वाळु माफियावर कारवाई करण्याची मागणी नागरीकांतुन होत आहे.

### » हप्ता द्या अन् अवैध वाळु उपसा करा?

एकीकडे जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवैध वाळु उपसा करणारे छोटे असो मोठे मासे पकडले जातात परंतु परतुरच्या दुधना नदी पात्राची चाळणी करणारा मोठा मासा हा प्रशासनाला सापडत नाही, एकीकडे परतुरचे तहसिल प्रशासन एक-दोन अवैध वाळुचे ट्रॅक्टर पकडून आपण किती कर्तव्यदक्ष असल्याचा आव आणत आहेत, परंतु मांजरीने डोळे झाकून दुध पिले महणजे इतरांच्या नजरेत येत नसावे असाच काहीसा प्रकार प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांकडून होतांना दिसत आहे, तर दुसरीकडे अवैध वाळु माफियांसाठी परतुरच्या तहसिल प्रशासनाने नविन योजना आखल्याचेही बोलले जात आहे की, हप्ता द्या अन् अवैध वाळु उपसा करा.

# मंजूर नियोजनाप्रमाणे खताचा पुरवठा करावा

## खतांची नियमित उपलब्धता राहील -जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमिवर खते आणि बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्याकरिता जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. तसेच पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात गुणवत्तापूर्ण बियाणे आणि खते उपलब्ध होतील असे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला आणि कृषी विभागाला दिले आहे. तरी सर्व खत उत्पादक कंपन्यांना कृषि आयुक्तालयामार्फत मंजूर नियोजनाप्रमाणे खताचा जिल्ह्यात पुरवठा करावा जेणेकरुन यामुळे खतांची नियमित उपलब्धता राखली जाईल, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी संबंधितांना बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच कृषी विभाग आणि खत उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कृषी विकास अधिकारी श्री.बनसावडे, कृषी उपसंचालक व कृषि विभागातील इतर संबंधीत अधिकारी तसेच सर्व रासायनिक खत उत्पादक कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्याकडून रासायनिक खत उपलब्धता व पुरवठ्याबाबत आढावा आढावा घेण्यात आला, तसेच पुढील नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यात सध्या २१ हजार १९६ मे.टन युरिया, ५ हजार २१८ मे.टन सिंगल सुपर फॉस्फेट (डब्झ) आणि ४३ हजार ३१४ मे.टन एनपीके संयुक्त इतका रासायनिक खतांचा साठा शिल्लक असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. कापसे यांनी दिली. जिल्ह्याला कृषि आयुक्तालयाकडून २२ हजार ४०३१ मे.टन खतांचे आवंटन मंजूर झालेले आहे. माहे जून-२०२५ अखेर एकूण ९७ हजार २८५ मे.टन खतांचे आवंटन मंजूर असून आज अखेर ७१ हजार २५ मे.टन खत उपलब्ध झालेला आहे. आज रोजी जिल्ह्यात एकूण ९४ हजार ८८९ मे.टन एवढा रासायनिक खताचा साठा उपलब्ध आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना डीएपी खताला पर्यायी इतर खतांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. डीएपीच्या जागी एसएसपी आणि युरिया यांचा योग्य प्रमाणात वापर करून पिकांची पोषणमूल्ये पूर्ण केली जाऊ शकतात, ज्यामुळे उत्पादन वाढण्यास मदत होते. सोयाबीन आणि कापूस या प्रमुख पिकांसह खरीप हंगामासाठी लागणारे सर्व प्रकारचे बियाणे जिल्ह्यात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. जिल्ह्यात विविध वाणांचे एकूण १३.६१ लक्ष कापूस बियाण्यांची पाकिटे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

शेतकऱ्यांनी एखाद्या विशिष्ट वाणाचा अनावश्यक आग्रह धरू नये. बाजारात उपलब्ध असलेल्या प्रमाणित आणि सुधारीत वाणांची निवड करावी, जेणेकरून वेळेवर पेरणी पूर्ण होऊन चांगल्या उत्पादनाची खात्री करता येईल असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेले वाण निवडणे नेहमीच फायदेशीर ठरते. शेतकऱ्यांनी खते आणि बियाणे खरेदी करताना पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी केवळ परवानाधारक, अधिकृत कृषी सेवा केंद्र किंवा विक्रेत्यांकडूनच खते व बियाणे खरेदी करावीत. पक्के बिल/पावती : प्रत्येक खरेदीसाठी पक्के बिल किंवा पावती घेणे बंधनकारक आहे. या पावत्यांवर खत/बियाण्याचा प्रकार, वाण, कंपनीचे नाव, लॉट नंबर, उत्पादन व अंतिम मुदत तारीख स्पष्टपणे नमूद असल्याची खात्री करावी. ही पावती भविष्यात गुणवत्ता किंवा इतर कोणतीही समस्या उद्भवल्यास पुरावा म्हणून उपयुक्त ठरेल. जादा दर आकारणी : जर कोणी विक्रेते खते किंवा बियाण्यांसाठी ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त पैसे आकारत असतील. कृत्रिम टंचाई निर्माण करत असतील अथवा अनुदानित रासायनिक खतासोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती करत असतील तर तात्काळ तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समितीच्या कृषि विभागाशी अथवा जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्षाच्या ८२७५०५१४०१ या क्रमांकावर संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## संक्षिप्त

### समाजिक न्याय विभागाच्या तालुकाध्यक्षपदी प्रभाकर प्रधान



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस च्या सामाजिक न्याय विभागाच्या परतुर तालुका अध्यक्षपदी प्रभाकर प्रधान यांची निवड जिल्हा अध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या नेत्तुवाखाली समजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांणी निवक्ती पत्र देऊण केले, यावेळी अल्पसंख्याक सेलचे वरिष्ठ महाराष्ट प्रदेश उपाध्यक्ष खय्युम खॉन परतुर तालुका अध्यक्ष विठ्ठलराव बरकुले, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत दंवडे, अनस खॉन, यांची उपस्थीती होती.

### महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या नवसंजीवनी योजनेचा पात्र खातेदारांनी लाभ घ्यावा – व्यवस्थापक राहुल पवार

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

महाराष्ट्र ग्रामीण बँकेची महाग्रामीण विशेष सवलत योजना जाहिर केली असून थकीत पीक कर्ज असणार्या शेतकर्याना व्याज सवलत देऊन त्यांना पुन्हा बँकेच्या मुख्य प्रवाहात आणता येईल व पुन्हा नवीन कर्ज मिळेल, एकरकमी सवलत योजना, अशा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या रामनगर शाखेचे व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने महाग्रामीण विशेष सवलत योजना जाहिर करण्यात आली असून त्यात थकबाकीदार कर्जदारांना व्याजात सवलत मिळून पुन्हा कर्ज मिळेल अजून एकरकमी सवलत योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त होता येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेने नवसंजीवनी योजना, शेतकरी समाधान योजना, उद्योजक दिलासा योजना आणि गटबंधन सहाय्यता योजना सुरु केली आहे.सदरील योजनेचा लाभ घेण्याची मुदत ही ३१ जुलै असून त्यापूर्वीच लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले. याशिवाय महाराष्ट्र ग्रामीण बँकेने चालू थकबाकीदार शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी एक आकर्षक व्याज सवलत योजना म्हणून महाग्रामीण किसान आधार योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत शेतकर्यांना आपले पिक कर्ज खाते नूतनीकरण करण्यासाठी व्याजात सवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र खातेदारांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या रामनगर शाखेचे व्यवस्थापक श्री राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.

# खुर्च्या जागेवर मात्र अधिकारी फरार! नगर परिषदेतील प्रकार

## नागरीकांच्या समस्या सोडविण्यास प्रशासन असमर्थ -गणेश नळगे





**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर शहरातील नागरीकांच्या समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढत चालल्या असुन याकडे नगर परिषद प्रशासन कायम दुर्लक्ष करत असल्याने सामाजीक कार्यकर्ते गणेश नळगे हे अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी परतुरच्या नगर परिषद कार्यालयात गेले असता त्यांना अधिकाऱ्यांच्या जागेवर केवळ मोकळ्या खुर्ची दिसून आल्या, त्यामुळे त्यांनी एका पत्रकाद्वारे या संबंधीत अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असुन शहरातील नागरीकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, शहरातील विविध भागात साचलेले कचऱ्याचे ढिगारे, कुठेही पावसाळ्या पुर्वी कामांचे नियोजन दिसून येत नसल्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, ह्याच संदर्भात शहरातील सामाजीक कार्यकर्ते गणेश नळगे हे नागरीकांच्या वतीने समस्या घेऊन अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेले मात्र संबंधीत अधिकारी एकही नसल्याने या समस्या मांडायच्या कोणाकडे असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित करून गैरहजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करून शहरातील नागरीकांच्या सोडविण्याचे विनंती प्रशासनाकडे केली आहे.

### भाजपा शहराध्यक्षपदी प्रवीण सातोनकर यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

भाजपा तालुका आणि शहर कार्यकारिणीची घोषणा नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच करण्यात आली.भाजपच्या परतूर शहराध्यक्षपदी प्रवीण सुधाकरराव सातोनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जातीय समीकरणे विचारात घेऊन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. ओबीसी बरोबर इतरही समाजात चांगला संपर्क असणारे प्रवीण सातोनकर यांच्यावर शहराध्यक्ष पदासारखी मोठी जबाबदारी सोपवून भाजपने सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग केला आहे. रविवारी शहरात आयोजित कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे,आ.बबनराव लोणीकर, प्रदेश सरचिटणीस राहुल लोणीकर यांच्याहस्ते नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. जाहीर करण्यात आलेल्या कार्यकारिणीत एक अध्यक्ष, ११ उपाध्यक्ष, ४ सरचिटणीस, १२ सचिव आणि एक कोषाध्यक्ष यांचा समावेश आहे. विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या देखील यावेळी घोषित करण्यात आल्या.

### चांदई (एक्को) येथे श्री खोलेश्वर मंदिरासमोर प्लेवर ब्लॉक कामाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या स्थानिक विकास निधीतून रु. १० लक्षांच्या खर्चाने चांदाई (एक्को) येथील श्री खोलेश्वर मंदिरासमोरील परिसरात प्लेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा आज शुभारंभ करण्यात आला.

या विकासकामामुळे - मंदिर परिसर अधिक स्वच्छ, सुसज्ज आणि भाविकांना सुगम होणार आहे. ग्रामस्थांना व पर्यटकांना सुविधाजनक परिसर लाभणार आहे. गावाच्या सौंदर्य व धार्मिक पर्यटन वाढीस चालना मिळणार आहे. भोकरदन तालुक्यात दर्जेदार कामे होत आहेत याचा मला मनस्वी आनंद होत आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबद्ध आहे.खा. डॉ. कल्याण काळे कार्यक्रमास स्थानिक ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी,, युवक यांची उपस्थिती होती. प्रारंभी श्री खोलेश्वर मंदिराजवळ पूजन करण्यात आले या वेळी जयप्रकाश चव्हाण,राम शिरसाठ,कैलास पुंगळे,अरुण पैठणे व गावकरी उपस्थित होते.

### संस्काराची शिदोरी राजमाता जिजाऊ -विष्णू पाचफुले



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संस्काराची शिदोरी म्हणजे राजमाता जिजाऊ आहेत असे प्रतिपादन शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी केले आहे. जालना शहरातील डबल जीन येथील विष्णू पाचफुले यांच्या संपर्क कार्यालयावर मां जिजाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी बोलताना पाचफुले म्हणाले की ,राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज घडवले व त्यासोबत स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज ही घडवले राजमाता जिजाऊंच्या संस्कारामुळे हे दोन्ही छत्रपती घडले, त्यामुळे राजमाता जिजाऊ या संस्काराची शिदोरी आहेत असे प्रतिपादन विष्णू पाच फुले यांनी केले यावेळी किरण गरड, संजय देठे, युवासेना जिल्हासमन्वयक शुभम टेकाळे, ,मारुती पवार ,कैलास यशवंते ,पांडुरंग खैरे आयुष राठोड आधी जण उपस्थित होते.

अकोलादेव येथे पुराच्या पाण्यात चार महीला वाहुन गेल्या असतांनाही प्रशासनाला जाग येईना

# पुल नसल्यामुळे शेतकऱ्यांना करावा लागतो जीवघेणा प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील अकोलादेव येथे शेतकर्यांना शेतात येण्या जाण्यासाठी खंडोबाचा ओढा ते शिराळा बुटखेडा या रस्त्यावर पुल नसल्याने शेतकर्यांना पुराच्या पाण्यात जीव धोक्यात घालून पुराच्या पाण्यातून वाट शोधावी लागत आहे. या खंडोबाच्या ओढ्या पलीकडे अणेक शेतकर्यांची जमीन आहे. तसेच हा अकोलादेव, बुटखेडा शिराळा हा जुना जवळचा मार्ग असल्याने अणेक शेतकरी, शेतमजूर,नागरीक येजाय करीत असतात. पावसाळ्यात हा ओढा दुथडी भरून वाहत असतो. याच पुराच्या पाण्यातून शेतकर्यांना पाण्यातून येजाय करावी लागते. या ओढ्यावर पुल बांधण्यासाठी शासन दरबारी अणेक वेळा मागणी करून सुध्दा प्रशासनाला अजून पाझर फुटायला तयार नाही. सन २०13 मध्ये याच ओढ्याच्या पाण्याच्या प्रवहात चार महीला वाहून जात असतांना अकोलादेव येथील नागरिकांच्या सतर्कतेमुळे या महीलांचे प्राण वाचले होते. यावेळी तत्कालीन तहसीलदार यांनी पाहणी करून येथे पुल तयार करावा यासाठी शासनाला कळविले होते. पण प्रशासनाने या घटनेला गांभीर्याने घेतले नाही. तात्पुरतते नळकांडी टाकून मोकळे झाले होते. दुस-याच वर्षी हे



नळकांडे वाहून गेले. अद्यापही हा पुलाला मंजुरी मिळाली नाही. हा पुल मंजुर व्हावा यासाठी गटशेती प्रमुख लक्ष्मण सवडे, चेअरमन गणेश बापु सवडे, माजी पंचायत समिती सदस्य दादाराव पाटील सवडे, माजी सरपंच रघुनाथ कदम,यांच्यासह शेतक-यांनी केली होती. पण मात्र या रास्त मागणीला निबरगठ्ठ अधिका-यांनी केराची टोपली दाखवली. शासन अजून किती पुराच्या पाण्यात वाहून जाणा-यांची वाट पाहणार आहेत का?असा सवाल शेतकरी करीत आहेत.

सदरील शेत रस्त्यावर अनेक दिवसापासून शेतकरी पुलाची मागणी करत आहे पण या मागणीकडे कोणीही लक्ष देत नाही १२ वर्षांपूर्वी याच ओढ्यात महिला वाहून जाताना शांताबाई पाटोळे यांनी त्यांचे प्राण वाचवले होते. शासन व्यवस्था जर या ठिकाणी काही दुर्घटना झाल्यावरच पुलाचे काम मनावर घेणार तर नक्कीच ही व्यवस्था गेंड्याच्या कातडीची झाली अस म्हणायला हरकत नाही.शासनाच्या संबंधित विभागाने लवकरात लवकर दखल घेऊन या पुल-ाचे काम तत्काळ करून शेतकऱ्यांची होणारी तारांबळ आणि कसरत थांबवावी.

अकोलादेव ते बुटखेडा,शिराळा या रस्त्याला क्रमांक मिळाला असून शासनाने या रस्त्याला मंजुरी देऊन तात्काळ पुलाचे व रस्त्याचे काम चालु करावे. -दादाराव पाटील सवडे, पंचायत समिती सदस्य

## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन
९०९६७०१२५३



# ड्रोन हल्ले रशियाला का रोखता आले नाहीत?

युक्रेनने रशियाच्या हवाई तळांवर केलेल्या ड्रोन हल्ल्यांनी संपूर्ण जग हादरले. युक्रेनने 'ऑपरेशन स्पायडर वेब' म्हणजेच ड्रोनचा एक थवा रशियाच्या पाच लष्करी हवाई तळांवर सोडला, ज्यामध्ये ४१ बॉम्बर विमाने आगीत जळून भस्मसात झाली. रशियाचे या हल्ल्यात ७ अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले आहे.

या प्रसंगाची तुलना 'ट्रोजन हॉर्स' या युद्धनीतीशी केली जात आहे. कारण रशियाच्या अंतर्गत भागांत एका लाकडी छताखाली या हल्ल्यासाठी एफपीव्ही (एफपीव्ही) नावाचे विशेष ड्रोन रशियामध्ये तस्करी करून आणले गेले. युक्रेनने रविवार, १ जून रोजी रशियाच्या हवाई तळांवर ड्रोनने हल्ले केले. ऑपरेशनचे नियोजन १८ महिन्यांपूर्वी सुरू झाले होते. युक्रेनने हल्ल्यामध्ये रशियाच्या मुर्मन्स्क, इर्कुत्स्क, इवानोवो, रियाझान आणि अमूर प्रदेशातील पाच हवाई तळांवर एफपीव्ही ड्रोनने हल्ले केले.

'ऑपरेशन स्पायडर वेब' या रशियन हवाई तळांवर झालेल्या ड्रोन हल्ल्यांची संरक्षण क्षेत्रात विशेष चर्चा होत आहे. या हल्ल्यात अनेक विमानांचे नुकसान झाले. या हल्ल्यांमुळे रशियाच्या हवाई संरक्षण प्रणाली, विशेषतः एस-४०० च्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### गुप्तचर यंत्रणेचे अपयश

रशियाच्या हद्दीतून कमी उंचीवर, जवळून प्रक्षेपण हे या हल्ल्यांचे वैशिष्ट्य होते. ट्रकमध्ये लपविलेल्या कंटेनर्समधून अनेक ड्रोन्स रशियाच्या हद्दीतूनच प्रक्षेपित करण्यात आले. ते अत्यंत कमी उंचीवर उडत होते, ज्यामुळे एस-४०० सारख्या लांब पल्ल्याच्या प्रणालींच्या रडार नजरेच्या/शोध क्षमतेच्या खाली होते. एस-४०० प्रामुख्याने जास्त उंचीवर उडणाऱ्या, लांब अंतरावरील विमाने आणि क्षेपणास्त्रांसारख्या धोक्यांसाठी डिझाईन केलेले आहे, स्वतःच्या संरक्षण परिघा मागून येणाऱ्या कमी उंचीवरील धोक्यांसाठी नाही. त्यामुळे मुख्य अपयश एस-४०० प्रणालीमध्ये नसून रशियन गुप्तचर यंत्रणेमध्ये होते. युक्रेन सुमारे दीड वर्षापासून या ऑपरेशनची योजना आखत होता आणि ड्रोन रशियामध्ये पोहोचवत होता. तरीही रशियन गुप्तचर संस्थांना हा महत्त्वपूर्ण धोका वेळेवर शोधण्यात अपयश आले.

स्वार्म हल्ले आणि बचाव यंत्रणेवर ताण एकाच वेळा मोठ्या संख्येने ड्रोन प्रक्षेपित करण्यात आले, ज्यामुळे स्थानिक बचाव यंत्रणांवर ताण आला. एस-४०० शक्तिशाली असले तरी, जर ड्रोन लहान असतील आणि खूप कमी उंचीवर उडत असतील तर समन्वित स्वार्म हल्ला अगदी प्रगत प्रणालींही (एस-४००) आव्हान देऊ शकतो.

तैनातीतील त्रुटी आणि स्तरीकृत संरक्षणाचा (मल्टी लेयर्ड एअर डिफेन्स) अभाव: काही प्रकरणांमध्ये, एस-४०० ला कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींच्या (जसे की पँत्सिर किंवा टॉर) पुरेशा समर्थनाशिवाय एकाकीपणे तैनात केले गेले होते, ज्या कमी उंचीवरील ड्रोनचा सामना करण्यासाठी अधिक योग्य आहेत. एस-४०० हे मोठ्या हवाई संरक्षण नेटवर्कचा फक्त एक थर आहे. कमी पल्ल्याच्या प्रणालींशी (जसे की पँत्सिर-एस१ किंवा टॉर-एम२) योग्य एकत्रीकरणाशिवाय ती काम करू शकत नाही.

भारतासारख्या देशांनी वापरलेली बहु-स्तरीय संरक्षण प्रणाली, विविध उंची आणि पल्ल्याच्या धोक्यांना तोंड देण्यासाठी विविध प्रणालींना एकत्र करते, जे रशियाने केले नव्हते.

एस-४०० युनिट्सना लक्ष्य करणे: युक्रेनने एस-४०० प्रणालीला नष्ट करण्याच्या दृष्टीनेच आपली व्यूहरचना आखली होती. क्षेपणास्त्र हल्ले करण्यापूर्वी रडार आणि अँटेनांना लक्ष्य करण्यासाठी अनेक ड्रोनचा वापर केला गेला ज्यामुळे मुख्य हल्ला होण्याआधीच रक्षण रडार प्रणाली नष्ट झाली.

मोठ्या प्रमाणावर झालेल्या या ड्रोन हल्ल्यानंतर रशियाच्या हवाई संरक्षण प्रणालीवर निश्चितपणे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रशियन अधिकाऱ्यांनी हल्ले मान्य केले तरी, नुकसानीच्या प्रमाणाने रशियाची ड्रोन विरुद्ध असुरक्षितता अधोरेखित झाली.

### हल्ला भारताकरता सावधानतेचा इशारा?

अशा प्रकारचा हल्ला सर्व देशांसाठी एक मोठा इशारा आहे. ऑपरेशन स्पायडर वेबमधील धडे भारताकरता पण आहेत. कोणताही देश अत्याधुनिक ड्रोन हल्ल्यांच्या धोक्यापासून सुरक्षित नाही, विशेषतः दहशतवाद्यांपासून किंवा नवीन रणनीती वापरणाऱ्या विरोधकांकडून. केवळ पारंपरिक, लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींवर अवलंबून राहणे आता पुरेसे ठरणार नाही. देशांना सर्वसमावेशक, बहु-स्तरीय संरक्षण रणनीती विकसित करण्याची आवश्यकता आहे, ज्यात काऊंटर-ड्रोन तंत्रज्ञान, कमी पल्ल्याचे हवाई संरक्षण, इलेक्ट्रॉनिक युद्धक्षमता आणि बळकट गुप्तचर नेटवर्क समाविष्ट आहेत. राष्ट्रीय सीमांमधून हल्ले होण्याची शक्यता वाढल्याने, वाढीव अंतर्गत सुरक्षा उपाययोजना आणि गुप्त ऑपरेशन्सविरुद्ध सतर्कता आवश्यक आहे. जॅमर, लेझर प्रणाली आणि अगदी विशेष इंटरसेप्टर ड्रोनसह प्रभावी काऊंटर-ड्रोन उपाययोजनांमध्ये संशोधन आणि विकास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतासमोर विकसित होणाऱ्या धोक्यांचे सतत मूल्यांकन केले पाहिजे आणि त्यानुसार त्यांच्या संरक्षण सिद्धांतांची काळानुरूप मांडणी करून ते प्रत्यक्ष आचरणात आणले पाहिजेत तसेच संरक्षण क्षमतांचे विकसन केले पाहिजे. स्पायडर वेब ऑपरेशन अधोरेखित करते की भविष्यातील युद्धात पारंपरिक आणि अपारंपरिक पद्धतींचे मिश्रण असण्याची शक्यता आहे, ज्यामुळे सर्व राष्ट्रांना जटिल आणि अनपेक्षित धोक्यांच्या नवीन युगासाठी तयारी करणे आवश्यक आहे. स्पायडर वेब अत्याधुनिक, कमी उंचीचा आणि समन्वयित हल्ला सूचित करतो की अगदी उच्च-स्तरीय प्रणालींनाही नावीन्यपूर्ण रणनीती (इनोव्हेटिव्ह टॅक्टिस) ने आव्हान दिले जाऊ शकते. कोणतीही संरक्षण प्रणाली निर्दोष नाही आणि नवीन धोक्यांचा सातत्याने शोध घेऊन ती प्रणाली अपडेट करणे, ती अधिकाधिक निर्दोष करणे महत्त्वाचे आहे.

### बचाव यंत्रणेवर ताण

स्पायडर वेब हे नाव अनेक दिशांनी ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि डिकॉय वापरून बहु-वेक्टर, स्वार्म-शैलीतील हल्ला करते. एस-४०० सारख्या प्रगत प्रणालींमध्येही ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे संख्या आणि एकाच वेळी लक्ष्य ठेवण्याची क्षमता मर्यादित असते. मोठ्या प्रमाणावर स्वार्म हल्ला रडार आणि फायर-कंट्रोल प्रणालींवर ताण आणतो. एकदा ताण आल्यानंतर, ड्रोनसारखी कमी किमतीची लक्ष्ये संरक्षणातील फटींमधून आत येऊ शकतात.

### एस-४०० अनुकूल, पण...!

फायटर जेट्स, डब्ल्यूसीएस, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि उच्च-गती क्रूझ क्षेपणास्त्रांचा सामना करण्यासाठी एस-४०० ही हवाई सुरक्षा प्रणाली अनुकूल आहे, स्वस्त, लहान एफपीव्ही ड्रोन, लोईटरिंग दारूगोळा किंवा डिकॉय स्वार्मसाठी नाही. युक्रेन मोठ्या संख्येने कमी किमतीचे, व्यावसायिक सुधारित ड्रोन वापरत आहे, जे लाखो डॉलर्सच्या इंटरसेप्टरचा वापर नाकाम करीत आहे.

### इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि स्टील्थ रणनीती

युक्रेनने आपली इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि जॅमिंग क्षमता सुधारली आहे, जी काहीवेळा रडार अंध करत किंवा ट्रॅकिंग प्रणाली गोंधळात टाकत आहे. काही ड्रोनमध्ये कमी रडार क्रॉस-सेक्शन्स असतात आणि ते हळू उडतात, ज्यामुळे लांब पल्ल्याच्या रडारमधून ते दिसत नाही.

### भूगोल आणि मर्यादा

अनेक ड्रोननी रशियन हद्दीच्या आत (उदा. मॉस्को किंवा बेलगोरोडजवळील हवाई तळ) खोलवर हल्ला केला, जिथे स्तरीकृत बचाव यंत्रणा पूर्णपणे तैनात नव्हती किंवा सतर्कता पातळी कमी होती. रात्री किंवा खराब हवामानात, रशियन पूर्व-इशारा प्रणाली वेळेवर ड्रोन शोधण्यात आणि त्यांना प्रतिसाद देण्यात अपयशी ठरली .

### पारंपरिक युद्धाची परिभाषा बदलली?

स्पायडर वेब हल्ले पारंपरिक युद्धाची परिभाषा बदलत आहे. शतकानुशतके पारंपरिक युद्ध मोठे सैन्य, रणगाडे, विमाने आणि नौदलांच्या थेट संघर्षाभोवती फिरत होते. तथापि, ड्रोन तंत्रज्ञान, सायबर युद्ध आणि माहिती ऑपरेशन्सच्या वाढीमुळे, रणांगण बदलत आहे. युद्धाचे एकूण तंत्रच पार बदलून गेले आहे.

ड्रोन कमी शक्तिशाली घटकांना अधिक तांत्रिकदृष्ट्या प्रगत विरोधकांना महत्त्वपूर्ण नुकसान पोहोचवण्यासाठी एक किफायतशीर मार्ग आहे. तुलनेने स्वस्त ड्रोन अनेक दशलक्ष डॉलर्सच्या विमानाला नष्ट करू शकते किंवा नुकसान तरी करू शकते.

स्पायडर वेब हल्ले अनपेक्षित ठिकाणांहून, कधीकधी देशाच्या हद्दीत खोलवर, सुरू होऊ शकतात, ज्यामुळे पारंपरिक सीमा अस्पष्ट होत आहेत आणि संरक्षण अधिक गुंतागुंतीचे बनत आहे.

### गुप्तचर तयारी महत्त्वाची आहे

स्पायडर वेबसारख्या ऑपरेशन्सचे यश गुप्त माहिती गोळा करणे, घुसखोरी करणे आणि दीर्घकाळ न पकडता काम करण्याची क्षमता यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यामुळे केवळ सामरिक मारक क्षमतेतून यश मिळत नाही. या हल्ल्यांचा महत्त्वपूर्ण मानसिक परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे संरक्षण प्रणालींवरील सार्वजनिक विश्वास कमी होतो आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते.

हा बदल अधिक अपारंपरिक, तंत्रज्ञान-आधारित संघर्षांकडे वाटचाल दर्शवतो जिथे चपळता, गुप्तचर पारंपरिक लष्करी सामर्थ्याइतकीच महत्त्वाची भूमिका बजावतात.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे/९४२२८०४४३०

# युक्रेनने रशियाचे कंबरडेच मोडले

युक्रेनच्या झेलेन्स्कीने रशियात खोलवर हल्ला करून अभूतपूर्व अशी सैनिकी कारवाई केली आहे. या हल्ल्यात रशियन एअरबेसेस तर उद्ध्वस्त झालेच शिवाय ४१ विमानेही मोडीत निघाली. ही साधीसुधी विमाने नव्हती. यातील काही विमाने टीयू ९५ आणि टीयू २२ प्रकारची होती. ही अतिशय वजनदार बॉम्ब्सचा वर्षाव करण्याची क्षमता असलेली विमाने होती. यातील काहींमध्ये तर अण्वस्त्रे वाहून नेण्याचीही क्षमता असते. टीयू १६० प्रकारची विमाने क्षेपणास्त्रे दूरवर वाहून नेण्याची क्षमता असलेली विमाने होती. यापैकी अनेक विमाने साधी जेट प्रकारची विमाने नव्हती तर ती कमी इंधनात प्रोपेलरच्या(फिरते पंखे) मदतीने उडणारी विमाने होती. ही विमाने बेकाम केल्यामुळे आणि विमानतळांवर खड्डे झाल्यामुळे रशियन विमानदलाचे ७ अब्ज डॉलर्स किमतीचे नुकसान झाले आहे. विमानताफा ३५ टक्क्यांनी रोडावला आहे आणि मर्मस्थानी घाव बसला आहे. हे नुकसान सहज आणि लवकर भरून येणारे नाही. त्यासाठी फार मोठी रक्कम आणि बराच काळ लागणार आहे. १ जून २०२५ हा रशियन विमानदलाच्या इतिहासातला काळा दिवस म्हणून नेहमीसाठी नोंदवला जाणार आहे. युद्धाचे पारडे फिरवण्याची क्षमता असलेल्या या मोहिमेचे नाव होते, 'ऑपरेशन स्पायडर वेब'! गुप्तता हे या मोहिमेचे विशेष वैशिष्ट्य होते. रशिया भलेही आम्ही काही ड्रोन पाडले, असा दावा करीत असला तरी रशियाच्या लष्कराला किंवा गुप्तहेर यंत्रणेला या हल्ल्याचा सुगावा वेळीच लागला नाही, हेच सत्य आहे. शिवाय रशियाचे म्हणणे मान्य करायचे ठरविले तर रशियाची हवाई संरक्षण कार्यप्रणाली यावेळी जवळजवळ अपयशी ठरली, असेतरी म्हणावे लागेल. या हल्ल्यामुळे केवळ रशियाच्या अणुहल्ला करण्याच्या क्षमतेवर आणि लष्करी प्रतिकारशक्तीवरच मोठा आघात झाला, असे नाही तर आता जगातले कोणतेही राष्ट्र, अगदी अमेरिका देखील आपण पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा करू शकणार नाही. संबंधित वैरी चिमुकला असला तरी!

जगातील सर्वांत मोठ्या रशिया या देशाचे क्षेत्रफळ सुमारे १,७१,९८,२४६ चौकिमी (भारताचे क्षेत्रफळ ३,२८७,२६३ चौकिमी) आहे आणि लोकसंख्या आहे सुमारे १५ कोटी. युक्रेनचे क्षेत्रफळ ५,७९,३२० चौकिमी (उत्तर प्रदेशाचे क्षेत्रफळ २,४३,२८६ चौकिमी) आहे आणि लोकसंख्या आहे सुमारे ४ कोटी. २४ फेब्रुवारी २०२२ ला रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाला प्रारंभ झाला. रशिया एका आठवड्यात युक्रेन पादाक्रांत करील, असे बहुतेकांना वाटत होते. पण युक्रेन भलताच टणक निघाला. २०२५ साल उजाडले तरी लढाई सुरूच! युक्रेनला अमेरिका आणि युरोपियन राष्ट्रांनी जी सर्वप्रकारची मदत केली त्यामुळेच हे शक्य झाले, ही वस्तुस्थिती असली, तरी लढले ते युक्रेनचेच योद्धे! १ जून २०२५ ला तर कहरच झाला!! रशिया अक्षरशः विव्हळ झाला. ही कमाल मात्र एकट्या युक्रेनची आहे. झेलेन्स्की आणि त्याचे तंत्रज्ञ, सेनाबहाद्दर यांनी 'ऑपरेशन स्पायडर वेब' ज्याप्रकारे आखले, रेखले, रचले आणि पराकोटीच्या गुप्ततेने पूर्णत्वास नेले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. तशी दुसऱ्या महायुद्धातील ऑपरेशन पर्ल हार्बरची आठवण होते आहे, हे खरे. जपानी नौदलाने अशीच सागरी मोहीम अमलात आणली होती. बेसावध गाठून केलेल्या हल्ल्यात जपानने अमेरिकन नौदलाचा पार धुव्वा उडवला होता.

'ऑपरेशन स्पायडर वेब', नुसार एकाच वेळी पाच ठिकाणी हल्ले करायचे होते. यातली तीन ठिकाणे म्हणजे एम-मुर्मन्स्क (नॉर्वेला लागून), आर-रायझन, आय-इव्हनोव्हो रशियन सरहद्दीला लागूनच होती. आय- इर्कुटस्क (सैबेरियात), ए-अमूर ही आत खोलवर होती. सरहद्दीपासून ४,५०० किलोमीटर आत सैबेरियात होती. मात्र, असे असूनही हल्ला एकाच वेळी करायचा होता. याचे कालविभागही (टाईम झोन्स) वेगवेगळे होते. ऑपरेशन आखायला सुरवात दीड वर्ष अगोदरपासून झाली होती. युक्रेनने या काळात रशियावर ड्रोन हल्ले आणि अन्य प्रकारचे हल्ले करून महत्त्वाची बहुतेक विमाने पाच सुरक्षित (?) केंद्रात केंद्रित करण्यास प्रवृत्त केले, असे म्हटले जाते. एकेकाळी युक्रेन सोव्हिएट रशियाचाच भाग होता. पुढे सोव्हिएट रशियाचे विभाजन झाले आणि रशिया व डझनभरापेक्षा जास्त देश अस्तित्वात आले. यामुळे ऑपरेशन स्पायडर वेबला स्थानिक स्तरावर रशियात साह्य मिळत गेले. चिमुकल्या युक्रेनने आपण रशियाच्या तोडीस तोड आहोत, हे दाखविण्यासाठीच हा खास खटाटोप केला असे दिसते. हल्ला करणारे ड्रोन लक्ष्यापर्यंत पोचविण्याची युक्रेनची शक्कलही अशीच नामी होती. ट्रकमध्ये लाकडी केबिन सारखी व्यवस्था होती. त्यात हे ड्रोन ठेवण्यात आले होते. शिवाय वर लाकडे रचली होती. एरवीही लाकडे किंवा खाद्यपदार्थ भरलेली अशी वाहने रशियात ये-जा करीत असतात. हे ट्रक्स लक्ष्याजवळ बिनभोबाट पोचविण्याची जबाबदारी युक्रेनच्या गुप्तहेर खात्याच्या एका शाखेने चोख पार पाडली. एकही ट्रक पकडला गेला नाही. ट्रकने रशियात प्रवेश करताच ड्रोन डागण्यात आले की लक्ष्याजवळ गेल्यानंतर, हे पुरतेपणी समोर आलेले नाही. तसेच एखादा ट्रक पकडता पकडता वाचला असणेही शक्य आहे. तसे काही घडले किंवा कसे हेही स्पष्ट नाही. हे बारीक तपशील यथावकाश समोर येतील. शंभरावर ड्रोन्स लक्ष्याच्या जवळ गुपचूप पोचविण्याची जबाबदारी संबंधित शाखेने यशस्वी रीतीने पार पाडली, असेच आजतरी मानले जात आहे. हाही एक जागतिक विक्रमच ठरावा. पुढे हे ड्रोन्स ट्रकमधून काढून 'मोबाईल किट हाऊसेस' मध्ये स्थलांतरित करण्यात आले. ही छोटीछोटी लाकडी घरे वाटावीत अशी वाहने होती. यांना चाके होती, म्हणून ती मोबाईल (हालचाल करू शकतील अशी) घरे म्हणून उल्लेखिली गेली आहेत. आश्चर्य तर पुढेच आहे. या घरांची छते रिमोट कमांडने वर उघडता येतील, अशी होती. परस्परांमध्ये हजारांपेक्षा जास्त किलोमीटर अंतर असणारी ही घरे लक्ष्यापर्यंत पोचल्यावर १ जून २०२५ चा मुहूर्त साधून युक्रेनमधील रिमोट कंट्रोलने कमांड देताच 'मोबाईल किट हाऊसेस' ची छते वर आकाशात उघडली. दुसरी कमांड मिळताच आतील ड्रोनने आकाशात अलगद उड्डाण केले आणि प्रत्येक ड्रोनने नेमून दिलेले लक्ष्य भेदले आणि रशियन हवाईदलावर जणू आकाशच कोसळले. ३५ टक्के विमानादी शस्त्रअस्त्रांचे भंगार झाले. क्षेपणास्त्र प्रक्षेपक निकामी झाले. हे सर्व सॅटलाईट्स दाखवीत आहेत.

ही सगळी हकीकत एखाद्या विज्ञानकथेतील वाटावी, अशी सुरस आणि चमत्कारिक आहे. युद्धशास्त्राच्या ग्रंथात 'ऑपरेशन स्पायडर वेब' ची पुढीलप्रमाणे वैशिष्टे नोंदविली जातील. १) हा खोलवर घुसून हल्ला करण्याचा अभिनव मार्ग गणला जाईल. २) या निमित्ताने कमीतकमी खर्च (एका ड्रोनच्या निर्मितीचा खर्च ४००० डॉलर) करण्यात आला. ३) युद्धशास्त्रीय तंत्रज्ञांमधील सर्व अग्रणींना आणि योजनाकारांना थक्क करणारे नियोजन म्हणून या नियोजनाला मान्यता मिळेल. ४) दीड वर्ष अगोदर नियोजन होत असूनही गुप्ततेला तडा गेला नाही, ही गुप्ततेची कमाल ठरेल. ५) युक्रेनचे पाठीराखे रशियात स्थानिक पातळीवर खोलपर्यंत दबा धरून कार्य करीत असल्यामुळेच हे ऑपरेशन एवढे यशस्वी झाले ६) यापुढे युक्रेनची हेरयंत्रणा जागतिक दर्जाची मानली जाईल. ७) ट्रक आणि सोबत गेलेले सर्व सैनिक आणि ट्रकचालक युक्रेनमध्ये सुखरूप परत आले, हाही विक्रमच ठरेल.




> जगातील सर्वांत मोठ्या रशिया या देशाचे क्षेत्रफळ सुमारे १,७१,९८,२४६ चौकिमी (भारताचे क्षेत्रफळ ३,२८७,२६३ चौकिमी) आहे आणि लोकसंख्या आहे सुमारे १५ कोटी. युक्रेनचे क्षेत्रफळ ५,७९,३२० चौकिमी (उत्तर प्रदेशाचे क्षेत्रफळ २,४३,२८६ चौकिमी) आहे आणि लोकसंख्या आहे सुमारे ४ कोटी. २४ फेब्रुवारी २०२२ ला रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाला प्रारंभ झाला. रशिया एका आठवड्यात युक्रेन पादाक्रांत करील, असे बहुतेकांना वाटत होते.

रशिया आणि युक्रेन यांच्यात सध्या युद्ध आटोपते घेण्याबाबत तुर्कीच्या इस्तंबूलमध्ये चर्चा सुरू आहे. त्यामुळे या काळात फारसे संघर्ष होणार नाहीत, असा अमेरिकादी राष्ट्रांचा समज होता. पण युक्रेनवरील दडपण वाढविण्यासाठी रशियाने युक्रेनवर या काळातही जबरदस्त ड्रोन हल्ले केले. याबाबत जगभर आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. या दडपणाला युक्रेन बळी पडणार नाही हे दाखविण्याचे काम ऑपरेशन स्पायडर वेबने चोखपणे बजावले आहे. अण्वस्त्रे वापरण्याची वेळ येणार नाही, आपण परंपरागत शस्त्रांच्या आधारावरच हे युद्ध जिंकू, असे रशियाचे अध्यक्ष पुतिन म्हणत होते. पण ती गोष्ट आता जुनी झाली आहे. २ जूनला चर्चेची फेरी पार पडणार होती. म्हणून युक्रेनने १ जूनचा मुहूर्त निवडला, असे म्हटले जाते. २ जूनला २०२५ ला इस्तंबूलमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यात झालेली शांतता चर्चा (पीस टॉक) झटपट आटोपती घेण्यात आली. झेलेन्स्कीने घोषणा केली आहे की, आम्ही स्वातंत्र्य, राष्ट्र आणि जनता यांचे रक्षण करण्याठी कटिबद्ध आहोत. रशियाच्या पुढील चालीकडे निरीक्षक लक्ष ठेवून असताना ३ जून २०२५ ला युक्रेनच्या लष्कराने युक्रेनच्या क्रिमिया प्रांताला रशियाशी जोडणारा महाकाय पूल ११०० किलो टीएनटी स्फोटके पाण्याखाली स्फोट घडवून उडवून दिला आणि आणखी दुसरा एक जबरदस्त धक्का रशियाला बसला. याचा व्हिडीओही पुराव्यादाखल प्रसारित झाला आहे. युक्रेनमध्ये आपल्या सेनादलांना सैनिक आणि रसद पुरविण्यासाठी २०१८ साली बांधलेल्या या पुलाचा रशियाला क्रिमियाशी संपर्क ठेवण्यासाठी उपयोग होत असे. रशियाची ही पुरवठा साखळी तुटल्यामुळे आता यापुढे या मार्गाने रशियाला युक्रेनमध्ये शिरलेल्या सैनिकांशी संपर्क साधणे कठीण होणार आहे. या दोन हल्ल्यांमुळे पुतिन यांचा तिळपापड झाला असून सूड म्हणून ते युक्रेनमधली खारकीव आणि सुमी सारखी काही शहरेच अण्वस्त्रे वापरून बेचिराख करणार आणि जग पुन्हा एकदा स्तंभित होणार की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

# कुटुंब प्रबोधन; काळाची गरज

कुठल्या तरी परदेश प्रवासाला आम्ही दोघंही पती-पत्नी निघालो होतो. प्रवासाचे व्यवस्थापन करणाऱ्या प्रवास कंपनीने भोजन, निवास, प्रवास, स्थळदर्शन अशी सगळीच जबाबदारी घेतली होती. वयाची पन्नाशी उलटलेली दहा-बारा जोडपी प्रवासात बरोबर होती. सर्वच लोक सुशिक्षित व सधन कुटुंबातील होते. त्यातील एक, शेगाव जवळच्या एका गावातून आलेल्या ताई दररोज आपल्या जेवणाच्या ताटात सगळेच पदार्थ खूप जास्त प्रमाणात वाढून घेत असत. नंतर मात्र, त्या पदार्थांना चवच नाही! हे पदार्थ आपल्या विदर्भा सारखे झालेलेच नाही! ब्रेडच्या पाच-सात स्लाईसेस पानात टाकून देत मला आवडतच नाही... असे म्हणून त्या पानात टाकून देत असत. न राहवून एक दिवस त्यांना आमच्या सौभाग्यवती म्हणाल्या, अहो ताई, खाववले जातील तेवढेच वाढून घ्या, अन्न वाया जाणं चांगलं नाही. यावर ताई रागावल्या... भाडूं लागल्या...

दक्षिणेतील एका मंदिरात दर्शनासाठी जायचे होते. मी लुंगी, वर उपरणे असा दक्षिण भारतीय पोशाखात निघालो. बरोबर काही नातेवाईक मंडळी होती. त्यात एक नुकतीच इंजिनीअर होऊन कमावती झालेली तरुणी, किती गरम होतंय ना, असं म्हणत खऱ्या अर्थाने आखूड असलेली हाफ पँट आणि टीशर्ट घालून निघाली. मी तिच्या वडिलांना सांगितले हा पोशाख मंदिरात चालणार नाही. वडिलांनी खांदे उडवले. मुलीला मंदिरात प्रवेश मज्जाव केला गेला. मुलीने लगेच दाक्षिणात्य रुढीवादावर शेलकी टीकाटिप्पणी केली. सगळे कुटुंब चिडचीड करीत राहिले. ती मुलगी सोडून इतरांनी मनोभावे दर्शन घेतले. मुलीचे आई-वडील काहीही न बोलता असहाय्यपणे आपल्याच मुलीकडे पहात राहिले.

एका मित्राकडे पंधरा वर्षांपूर्वी मुंबई येथे गेलो होतो. मित्र विदर्भातील मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातला. पण आधुनिक काळातील यशस्वी, म्हणजे लाखो रुपये मिळवणारा. संध्याकाळी त्याच्या घरी मुक्कामाला पोचलो. गप्पाटप्पा झाल्या. मित्राने त्याच्या फ्लॅटच्या टिचभर टेरेसवर टेबल आणि खुर्च्या मांडल्या. मग कुठलीशी किमती दारूची बाटली आणि ग्लास मांडले. मला आग्रह केला. मी स्वच्छ शब्दात नकार दिला. त्याने आपल्या इंजिनीअर होऊ घातलेल्या मुलाला आवाज दिला. दारूचे पेले भरले. मी दारू न पिणारा. म्हणून मला कुत्सित हसत आपण कसे प्रोग्रेसिव्ह आहोत हे सांगत आन्हिक सुरू केलं. मी मात्र त्याच्या बायकोने केलेल्या सुरेख भोजनाचा आस्वाद घेतला. परवा तोच मित्र भेटला. मुलांच्या दारूच्या व्यसनामुळे हवालदिल झालेला.

वरील उदाहरणांचा विचार केला तर लक्षात येईल की, संवाद आणि संस्कार, या दोन बाबी तीनही कुटुंबातून घडत नसाव्यात. कुटुंबातून होणारे प्रबोधन तीनही घरांमधून होत नव्हते. त्यामुळे अशा हजारो घटना आपल्या भोवताली घडताना दिसत आहेत. कुटुंब प्रबोधन नसल्याने भारतीय समाजातील कुटुंबांचे स्वास्थ्य ढासळले आहे.

पंच परिवर्तनातील स्वबोध आणि नागरिक कर्तव्यांचे पालन यानंतर येणारा आयाम म्हणजे कुटुंब प्रबोधन हा होय. भारतीय समाजाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील कुटुंब व्यवस्था होय. कुटुंब ही मागील हजारो वर्षांपासून भारतीय समाजातील एक महत्त्वपूर्ण संस्था म्हटली पाहिजे. आजच्या काळातील संकल्पनेनुसार जरी विचार केला तरी, कुटुंब किमान सहा व्यक्तींचे मिळून बनते. एका कुटुंबात तीन पिढ्यांचे सहजीवन दिसून येते. या तीनही पिढ्या, आधार आणि संस्कारांच्या माध्यमातून एकमेकांना संरक्षण व स्थैर्य देत असतात. इथे कुटुंबातील कर्ता किंवा कुटुंबप्रमुख ही जबाबदारी आहे, जी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे काळाच्या ओघात सहजसुंदरतेने हस्तांतरित होत असते. तीन पिढ्यांमधील सदृढ नातेसंबंध यामुळे प्रस्थापित होतात. वडील पिढी एका ठरावीक वयानंतर सल्लागाराच्या भूमिकेत जाते. तर तरुण पिढी निर्णय घेणे, त्या निर्णयाला प्रत्यक्षात आणणे आणि काळानुरूप सोयी-सुविधांच्या निर्मितीच्या जबाबदारीचे वहन करते. त्याच वेळी या दोन्ही वरिष्ठ



पिढ्यांनी भविष्यातील पिढ्यांना संस्कार, सुरक्षितता, शिक्षण आणि स्व-क्षमतांचा विकास करण्यासाठी दिशादर्शन व सहाय्य करणे हे कुटुंब व्यवस्थेत अभिप्रेत आहे. संस्कार हे जीवनानुभव, परंपरा व सांस्कृतिक वारशाचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वहन करण्याचे महत्त्वपूर्ण साधन होय. कुटुंब व्यवस्थेत जबाबदारी आणि कामाची विभागणी नैसर्गिक रीत्या होत असते. प्रत्येक पिढीला या सगळ्याची जाणीव आपोआप होत जाते. मात्र, यासाठी संपूर्ण कुटुंबाने रोज किमान एक तास एकत्र येणे, एकमेकांशी संवाद साधणे, एकमेकांच्या अडचणी/प्रश्न समजून घेत त्यावर योग्य उपाययोजना करणे, मजेत गप्पा मारीत हसतखेळत खाद्य पदार्थांचा आस्वाद घेणे आवश्यक असते. दुर्दैवाने असे अत्यंत खेळीमेळीचे वातावरण, संवाद, गप्पाटप्पा आज भारतीय कुटुंबातून नाहीशा होताना दिसतात. वास्तविक यासाठी कोणतेही विशेष परिश्रम घेण्याची कोणतीही आवश्यकता नाही. फक्त कुटुंबातील सर्व सदस्यांनी रोज एखादा तास एकत्र घालवला तरी या गोष्टी सहज घडून येतात.

सुरुवातीलाच दिलेल्या तीनही उदाहरणांचा विचार केल्यास, या कुटुंबांनी एकत्र येऊन वेळ घालवला नव्हता आणि एकमेकांशी संवाद साधला नव्हता असेच म्हणावे लागते. कौटुंबिक संवाद हा परिपूर्ण आणि जीवनस्पर्शी असला पाहिजे. कौटुंबिक संवाद क्रिकेट, सिनेमा, राजकारण या विषयांच्या पलीकडे जाणारा असला पाहिजे. धर्म, संस्कृती, भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञान, प्रथा-परंपरांमागील जीवनदृष्टी, अनुभवांचे आदानप्रदान, तसेच क्षमतांच्या निर्मितीसाठी सहायक असा सौहार्दपूर्ण व कुटुंबात आपलेपणा तसेच परस्पर विश्वास निर्माण करणारा संवाद असायला हवा. आज जबाबदारी विरहित उपभोग किंवा चैन करण्याकडे तरुण पिढीचा कल वाढताना दिसतो. कारण जबाबदारीचे वहन करण्यासाठी माणसांमध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी लागते. कर्तव्य पूर्तीसाठी आवश्यक असते ती त्यागाची भावना. तसेच कुटुंबाप्रती, समाजा प्रती, देशाप्रती, धर्म-संस्कृतीप्रती असलेली बांधिलकीची जाणीव. आजची पिढी विवाहसंबंध आणि मुलं जन्माला घालण्याच्या, त्या मुलांचे लालनपालन करण्याच्या, पुढील पिढीला संस्कार, संस्कृती, परंपरा वा हिंदू धर्मविचार संक्रमित करण्याचे उत्तरदायित्व याबाबत उदासीनता बाळगू लागली आहे. त्यामुळे मग लिव्ह इन रिलेशनशिप, नो चाईल्ड, विवाहबाह्य संबंध अशा समाज विघातक गोष्टींना आपलेसे करताना दिसते. त्यांना विवाह व त्यातून येणाऱ्या जबाबदाऱ्या म्हणजे अनावश्यक ओझे वाटू लागले आहे. त्यामुळे नव्या पिढीशी अगदी किशोरवयीन मुलांशी सामाजिक, भावनिक व आर्थिक दृष्ट्या अर्थपूर्ण संवाद आज आवश्यक झाला आहे. या अत्यंत कौटुंबिक संवादांना आमचा समाज, तसेच मागील दोन पिढ्या पारख्या झाल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक कुटुंबात हिंदू धर्म-संस्कृती, हिंदू इतिहास तसेच त्यातून साकार करावयाचे सामाजिक, राष्ट्रीय भविष्य या विषयांवर संवाद घडत रहाणे आवश्यक झाले आहे. असे सुसंवादी वातावरणच कौटुंबिक प्रेम आणि आदर, अधिक सुदृढ करू शकते. मग आमच्या मुलामुलींना कुटुंबाबाहेरील व्यक्तींशी आपल्या अडचणी वा भावना व्यक्त करण्याची गरजच वाटणार नाही. आज तरुण पिढीने कुटुंबाबाहेर बादरायण संबंध निर्माण करण्यामागील सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे म्हणणे ऐकून घेणारी, त्यांना समजून घेऊन सल्ला देणारी कोणीही व्यक्ती त्यांना त्यांच्या कुटुंबात मिळत नाही हे आहे. मग त्यातून कुटुंबाबाहेरील परधर्मीय व्यक्तींशी बादरायण संबंध निर्माण होऊन, कुटुंबात तुटक संबंध, त्यातून लव्ह जिहाद, धर्मपरिवर्तन अशा घटना घडतात. त्यामुळे लहानपणापासून कुटुंबातूनच आपलेपणा व हिंदू जीवनमूल्यांची शिकवण सहजपणे देता येईल. वाढत्या वयाबरोबर या जीवनमूल्यांची रुजवण होत जाईल. पण आज कौटुंबिक संवाद आणि त्यातून सहजतेने होऊ शकणारे संस्कार यांना असलेले दोन अडथळे म्हणजे घराघरातील टीव्ही आणि मोबाईल फोन होत. या दोन्ही गोष्टी कुटुंबातील प्रत्येक सदस्याने घरी कुटुंबीयांसोबत असताना एका निश्चित कालावधीसाठी संपूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक झाले आहे. रा. स्व. संघाला कुटुंब प्रबोधनाच्या तीन पायऱ्या होणे अभिप्रेत आहे. पहिल्या पायरीवर संघ स्वयंसेवकांनी आठवड्यातून किमान एक दिवस आपल्या कुटुंबात हिंदू इतिहास, हिंदू संस्कृती, प्रथा परंपरा या विषयांवर संवाद करावा. दुसऱ्या पायरीवर स्वयंसेवकांच्या कुटुंबांचे एकत्रीकरण करून, इतिहास, संस्कृती आणि हिंदू जीवनदृष्टी व मूल्ये याविषयी चर्चा आणि उद्बोधन करावे. तर तिसऱ्या पायरीवर विविध कुटुंबांनी आपल्या सभोवतालच्या कुटुंबांशी संपर्क साधून वरील विषयांवर चर्चा करावी. हे सगळे वरपांगी जरी सहज आणि सोपे वाटत असले तरी त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला अभ्यास आणि तयारी करावी लागणार आहे. यासाठी प्रत्येकाला स्वतःचे वाचन वाढवावे लागेल. काही प्रमाणात वाचनातून मिळणाऱ्या माहितीचे तर्कशुद्ध विश्लेषण करण्याची सवय करावी लागेल. तसेच आपल्यापेक्षा वयाने, अनुभवाने, शिक्षणाने, ज्ञानाने कमी असणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्याची सवय करावी लागेल. आपल्यापेक्षा वेगळे जीवनानुभव समजून घेत ते स्वीकारण्यासाठी मनाची व बुद्धीची तयारी करावी लागेल. हे सगळे संघ आपल्या अपेक्षित स्तरावर साधण्यात यशस्वी ठरला तर संपूर्ण हिंदू समाजाची बौद्धिक, वैचारिक, मानसिक आणि भावनिक उंची प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढेल हे निश्चित.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



बीड शहरातील भाजी मंडई मध्ये कच्ची खारिक मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आली आहे.(छाया कृष्णा शिंदे)

# खतांच्या स्टॉकची आकडेवारी समोर आणा, कृत्रिम टंचाई किंवा लिंकिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

## – आ.धनंजय मुंडे यांच्या कृषी अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ जून**

पेरणीच्या तोंडावर काही डीलर्स स्वतःकडे खताचा साठा असूनही तो लपवत असल्याचा व कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याच्या तक्रारी येत असून, कृषी विभागाकडूनही काही प्रमाणात खत येणे बाकी असून आवश्यक साठा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, तसेच स्थानिक डीलर्स कडे उपलब्ध असलेल्या साठ्याची आकडेवारी तात्काळ समोर आणावी, अशा सूचना आज माजी कृषमंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी खत व्यवस्थापन प्रमुख तसेच स्थानिक तालुका कृषी अधिकारी यांना केल्या आहेत.

जून अखेर परळी मतदारसंघात आवश्यक असलेल्या युरियासह, डीएपी व अन्य आवश्यक खतांच्या साठ्यामध्ये जो फरक आहे, तो फरक रेक लावून तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही धनंजय मुंडे यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधत सूचना केल्या.

खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे तसेच प्रमुख मागण्या असलेली व नामांकित खते डावलून जाणीवपूर्वक लिंकिंग करत निकृष्ट दर्जाची खते पर्याय म्हणून जबरदस्तीने विकणाऱ्या डीलर्स व दुकानदारांची नावे उघड करून त्यांच्यावरती तातडीने शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असेही सूचना धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



# परळी पंचायत समितीसमोर परळी पंचायत समितीसमोर हायवा टिप्पर अनियंत्रित; मोठा अपघात टळला



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ जून**

सोमवार, दिनांक १६ जून रोजी परळी शहरातील पंचायत समिती समोरील मुख्य रस्त्यावर एक हायवा टिप्पर अनियंत्रित झाल्याने अपघाताची भीती निर्माण झाली होती. याच दिवशी शहरात आठवडी बाजार भरत असतो, त्यामुळे परिसरात नागरिकांची वर्दळ अधिक असल्याने हा प्रकार गंभीर स्वरूपाचा ठरू शकला असता. मात्र सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

सदर टिप्पर भरधाव वेगाने जात असताना चालकाचा ताबा सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला झुकले. काही क्षणातच परिसरात खळबळ उडाली. काही नागरिकांनी तत्काळ धाव घेत वाहनाला थांबवण्याचा प्रयत्न केला. अपघाताचा धोका निर्माण होऊनही कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सोमवारी आठवडी बाजाराच्या दिवशी शहरातील मध्यवर्ती रस्त्यावर प्रचंड गर्दी असते. अशा गर्दीच्या वेळी अवजड वाहनांची बिनधास्त वर्दळ अत्यंत धोकादायक ठरू शकते. याकडे प्रशासनाचे व वाहतूक विभागाचे गंभीर दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शहरात अनेक ठिकाणी अवैध मालवाहतूक करणारी वाहने विनापरवाना फिरत असून, अपघाताच्या घटना घडण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे अशा वाहनांवर त्वरित आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# घरकुलाचा पहिला हप्ता न मिळालेल्या लाभार्थ्यांसाठी पंचायत समितीमध्ये विशेष शिबीराचे आयोजन–आ.विजयसिंह पंडित

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१७ जून**

पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाच्या लाभार्थ्यांपैकी सुमारे १५५५ लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते मिळत नसल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभुमीवर आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी पुढाकार घेवुन पंचायत समितीमध्ये संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेवुन आढावा घेतला. मंगळवार दि. १७ जुन रोजी सकाळी ११ वाजल्यापासुन थकीत असलेला पहिला हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन वाटप करण्याची प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी आधार कार्ड, बँक पासबुक यासह आवश्यक कागदपत्रे घेवुन पंचायत समिती कार्यालयात उपस्थित रहावे किंवा सरपंच व ग्रामसेवक यांच्या मार्फत ही कागदपत्रे उपलब्ध करुन देवुन शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यात विविध योजनेतील घरकुलाच्या हप्त्याचे वाटप होत नसल्याबाबतच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभुमीवर आ. विजयसिंह पंडित यांनी विशेष लक्ष घातले. बीड जिल्ह्यातील इतर पंचायत समितीच्या तुलनेत सार्वाधिक संथगतीने घरकुलाच्या संदर्भातील प्रक्रिया गेवराई पंचायत समितीमध्ये सुरु असल्यामुळे त्यांनी संबंधित विभागाला या बाबतच्या सुचना दिल्या. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सोमवार दि. १६ जुन रोजी दुपारी पंचायत समिती कार्यालयात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत त्यांनी या बाबत चर्चा करुन घरकुल लाभार्थ्यांना हप्तत्याचे वाटप करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम अखण्याच्या सुचना दिल्या. त्यांच्या सुचनेनुसार मंगळवार दि. १७ जुन रोजी पंचायत समिती कार्यालयात विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजल्या पासुन या शिबीराला सुरुवात होणार असुन यासाठी आवश्यक संगणक तंत्रज्ञ व इतर साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.गेवराई तालुक्यातील लाभार्थ्यांनी गर्दी टाळण्यासाठी संयमाने प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करण्याचे आवाहन करतांना पहिल्या दिवशी मंगळवार दि. १७ आणि बुधवार दि. १८ या दोन दिवसात पहिला हप्ता थकीत राहिलेल्या १५५५ लाभार्थ्यांचे ऑनलाईन पेमेंट वाटपाचा कार्यक्रम होणार असुन त्यानंतर दुसरा आणि तिसरा हप्ता वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. गेवराई तालुक्यासाठी नविन १६००० घरकुलांचे टार्गेट आले असुन याच कालावधीत नविन घरकुल मंजुरीची कार्यवाही सुरु असणार आहे. हप्ता वितरीत करण्यासाठी आयोजित केलेल्या कॅम्प मध्ये जिल्हा परिषद गट निहाय ९ विभाग करण्यात आले असुन त्यासाठी क्षेत्रिय अधिकारी, ऑपरेटर व इतर कर्मचाऱ्यांची ग्रामपंचायत निहाय लाभार्थ्यांच्या संख्येनेनुसार निवड केलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी एकाचवेळी गर्दी न करता आपल्या सोईनुसार मंगळवार आणि बुधवार या दोन दिवसात संपर्क करुन आयोजित केलेल्या विशेष शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.



# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ जून**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करावे असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १८ जुलै २०२५, ही आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैदकीय, व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील, अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीना महामंडळ कडून जेष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे दि. १८ जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संपूर्ण कागदपत्रासह मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीने जिल्हा कार्यालयाला संपर्क करावा. उशिरा आलेल्या कागदपत्र अर्जाचा जिल्हा कार्यालयामार्फत स्विकार करण्यात येणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

पुढीलप्रमाणे मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत.

मार्कशीट अर्थात गुण प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन फोटो, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेटसह व जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज कागदपत्रासह कार्यालयात आणून दाखल करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे-सरपते यांनी केले आहे.

जिल्हा कार्यालयाचा पत्ता

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन शासकिय विश्रामगृह समोर बीड

फोन – ०२४४२-२२४९१६

# धनंजय जगताप यांचा समर्थकांस राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षात प्रवेश

## आ.संदीप क्षीरसागरांनी केले नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ जून**

राजकारण आणि समाजकारणात सातत्याने सक्रिय असलेले, बीड पंचायत समितीचे माजी उपसभापती अरूण जगताप यांचे सुपुत्र धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक समर्थकांसह, आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला.



बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे मंगळवारी (दि.१७) रोजी धनंजय जगताप यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. यावेळी धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक कार्यकर्ते आणि समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश घेतला. यावेळी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे आ.संदीप क्षीरसागरांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य, ध्येय व चांगल्या सवयी आत्मसात कराव्यात–पत्रकार किशन भदर्गे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ जून**

शहरातील नावारूपाला आलेली व प्रतीथ यश राजस्थानी माध्यमिक व प्राथमिक शाळेमध्ये आज दिनांक १६ जून २०२५ रोजी शाळेचा पहिला दिवस असल्याने इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे व विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ व खेळणी पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले व आनंदाच्या व हरषोउल्लासाच्या वातावरणात शाळेचा पहिला दिवस सुरू झाला याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष व सायं दैनिक अभिमानाचे माजलगाव तालुका प्रतिनिधी किशन भदर्गे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य ध्येय निश्चिती व



चांगल्या सवयी आत्मसात करून पुढील आयुष्यामध्ये चांगली शिक्षण घेऊन स्वतःचा सर्वांनी विकास करून घ्यावा या कार्यक्रमाचे अध्यक्ष व माहेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री ओमप्रकाश मानधने संस्थेचे सचिव व ज्येष्ठ संपादक श्री रामानंदजी लड्डा, राजस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.तौर सर प्रार्थमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तौर मॅडम तसेच पालकांचे प्रतिनिधी लांडगे आप्पा

याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व त्यांना पुष्प देऊन त्यांचं सहर्ष स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. तौर मॅडम यांनी केली सूत्रसंचालन मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सरांनी केले.

# क्लास वन अधिकाऱ्याच्या मुलीचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ जून**

सध्या पालक मुला-मुलींना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण देण्यासाठी प्राधान्य देत असताना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अंबाजोगाई जेष्ठ अधिव्याखाता श्रीकिशन देशमुख व सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या सौ किरण देशमुख-तौर यांनी त्यांच्या मुलीला खाजगी शाळेत किंवा इंग्रजी शाळेत प्रवेश न देता जिल्हा परिषद शाळेत शिकविण्याचा निर्णय घेतला व शाळेच्या पहिल्या दिवशी स्वतः माजलगाव तालुक्यातील सावरगाव केंद्रात असलेल्या जिल्हा परिषद प्राथमीक शाळा गुजर पंचशिल या शाळेत जाऊन मुलीचा प्रवेश निश्चित केला.



जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी होत असताना अशा प्रकारचा निर्णय ज्येष्ठ अधिव्याख्याता श्रीकृष्ण देशमुख व प्राध्यापिका किरण देशमुख - तौर यांनी घेतला ही एक कौतुकाची बाब आहे .सर्व जिल्हा परिषद शिक्षक , अधिकारी ,कर्मचारी यांनी जर जिल्हा परिषद शाळेमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश दिला तर जिल्हा परिषद शाळेचा दर्जा नक्कीच सुधारेल. देशमुख यांचे हे पाऊल जिल्हा परिषद शाळांना गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रेरणादायी असल्याचे दिसून येते.

## टी.सी.हरवला आहे

यश गणेश लोहिया नावाचा १२ वी विज्ञान पासचा टी. सी. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातून जुन्या मोंढ्याकडे जाताना हरवला आहे .कृपया सापडल्या संपर्क साधावा.

संपर्क
९८५०१८९४०१